पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २८५ ■ शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/2012 /49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# महापालिकेत 'स्थापत्य'चा बोगस कारभार !

## ◆ मालमत्ताधारक त्रस्त ◆ जुनाच डेटा 'कॉपी-पेस्ट' करून जनतेच्या पैशांची लूट ?



प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोला :** अकोला महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता सर्वेक्षणाचे काम करणाऱ्या 'स्थापत्य कन्सल्टन्सी'च्या कारभारावर आता गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. मालमत्तांचे प्रत्यक्ष मोजमाप न करताच केवळ कागदी घोडे नाचवून कोट्यावधीचे देयके लाटण्याचा उद्योग सुरू असल्याचा खळबळजनक आरोप मालमत्ताधारकांनी केला आहे. विशेष म्हणजे, पूर्वीच्या 'स्वाती इंडस्ट्रिज'चा डेटा जसाच्या तसा कॉपी-पेस्ट करून प्रशासनाची आणि जनतेची दिशाभूल केली जात असल्याचे उघड होत आहे. तर मालमत्ता कर विभागातील अधिकारी व कर्मचारी स्वाती इंडस्ट्रिजने डाटा खराब केल्याचे खाजगीत सांगत आहे. महापालिका कोट्यावधी रुपये स्थापत्यला मालमत्ता सर्वेक्षणासाठी देत असताना स्थापत्य कंपनीचे किती कर्मचारी कामाला आहे. त्यांचा पीएफ भरला जातो की नाही याची खातरजमा महापालिका व पीएफ ऑफिसने करण्याची गरज आहे.

### 'स्वाती इंडस्ट्रिज'चा जुनाच वारसा!

स्थापत्य कन्सल्टन्सीने सर्वेक्षणाच्या नावाखाली केलेल्या 'उद्योगात' धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. स्वाती इंडस्ट्रिजने नोंदवलेले जुने मोबाईल क्रमांक आजही जसेच्या तसे आहेत. नवीन अपडेट न करताच कामाचा अहवाल सादर करण्यात आला आहे. काही मालमत्ता धारकांचे तर नसलेले मोबाईल क्रमांक टाकले आहे. त्यामुळे त्यांना ऑनलाईन कर भरता येत नाही. कॉपी पेस्टसाठी स्थापत्यला काम दिले कोणी आणि त्या कामाचे ऑडीट करते कोण असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### लुटारू टोळ्यांचे आका कोण ?

◆ जर मालमत्ता जैसे थे आहेत, तर वारंवार असेसमेंट कशासाठी ? हा थेट भ्रष्टाचार आहे. प्रशासनाने तात्काळ या कन्सल्टन्सीचे पेमेंट थांबवून सखोल चौकशी करावी. ज्या ठिकाणी मालकच भोगवटदार आहे. त्या ठिकाणी नवा भोगवटदार चढविण्याचा खोडसाळपणा कोणी केला. अकोलेकरांच्या लुटारु च्या टोळ्यांचे प्रमुख कोण ?

- **संतप्त मालमत्ताधारक,** अकोला.

### स्थापत्य कंपनीचा आका कोण ?

'स्थापत्य कन्सल्टन्सी' कडून महापालिकेने स्वॉफ्टवेअर विकत घेतले असताना पुन्हा त्याच त्याच कामासाठी महापालिका कुठल्या आधारावर पैसे त्यांना देत आहे. कुठल्या पुर्वतील आका ची ही कंपनी आहे जी अकोलेकरांची लुट करत आहे. स्वाती इंडस्ट्रीने जर मालमत्तांचे सर्वेक्षण (असेसमेंट) केले होते तर मग स्वाती इंडस्ट्रिजला पण पैसे देत स्थापत्य ला पण पैसे देण्याचा उद्योग कोणाच्या सांगण्यावरुन झाला. अशा किती नक्षाच्या फाईल्स स्थापत्यने मालमत्ताधारक, महापालिका व टॅक्स विभागाला दिल्या याची विचारणा होत आहे. महापालिकेचे कुठले कर्मचारी स्थापत्य कन्सल्टन्सी सोबत मोजमाप करायला जातात. त्यांचा ड्युटी चार्ट कुठे असा प्रश्न विचारला जात आहे. हे सगळे टाळण्यासाठी स्थापत्य कन्सल्टन्सी अकोलेकरांची कोणत्या आका मार्फत फसवणुक केली अशी विचारणा होत आहे.

### प्रत्यक्ष सर्वे गायब, मग पैसे कशाचे ?

अकोल्यातील अनेक सुज्ञ नागरिकांनी तक्रार केली आहे की, त्यांच्या मालमत्तेत गेल्या अनेक वर्षांत 'सुताचाही फरक' पडलेला नाही. असे असतानाही केवळ असेसमेंट वाढवण्यासाठी आणि कन्सल्टन्सीचे खिसे भरण्यासाठी वारंवार मोजणीचा घाट घातला जात आहे. ज्या मालमत्तांचे सर्वेक्षण झालेच नाही, त्याचे पैसे कन्सल्टन्सीला का दिले जात आहेत, असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे. कर भरणाऱ्या नागरिकांची ही लुट असून त्यातून इतर विकास कामे होऊ शकतात. पण, त्याकडे महापालिका प्रशासनाचे दूर्लक्ष आहे.

### भोगवटदाराचे नाव कोणी चढविले

मालमत्ताधारकांना विश्वासात न घेता परस्पर भोगवटदारांची नावे बदलण्याचा 'विक्रमी' पराक्रम या स्थापत्य कन्सल्टन्सीने केल्याचा आरोप आहे. काही ठिकाणी महापालिकेचा तर काही ठिकाणी स्वाती इंडस्ट्रिजचा जुना डेटा वापरून केवळ तारीख बदलण्याचे काम सुरू असल्याची चर्चा महापालिका वर्तुळात रंगली आहे. अमरावतीच्या एकमेव एजन्सीला हे काम का देण्यात आले? अकोला महापालिकेत असा कोणता 'वरदहस्त' आहे जो या त्रुटींकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहे? असेसमेंटचे दर वाढवून सर्वसामान्यांचे कंबरडे मोडणाऱ्या या 'लुटारू' कन्सल्टन्सीवर कारवाई होणार की भ्रष्टाचार असाच चालू राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अकोल्यात वंचितचा एल्गार !

## ◆ हद्दवाढीतील अन्यायाविरोधात धडकला 'निर्णायक मोर्चा'

प्रतिनिधी २४ एप्रिल



**अकोला :** २४ एप्रिल २०२६ 'हद्दवाढ झाली, पण सुविधा कुठे?' असा संतप्त सवाल करत आज वंचित बहुजन आघाडीने अकोला महानगरपालिका प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. अकोला पूर्व महानगरच्या वतीने आयोजित या 'धडक मोर्चाने' आज शहरात प्रशासकीय यंत्रणेची झोप उडवली. गांधी जवाहर बाग येथून सुरू झालेला हा जनसागर थेट महानगरपालिकेवर धडकल्याने परिसरात तणावपूर्ण शांतता आणि प्रचंड उत्साह पाहायला मिळाला.

अकोला शहरात समाविष्ट झालेल्या २४ गावांच्या हद्दवाढीनंतरही येथील नागरिक आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. विशेषतः प्रभाग क्र. ३, ४, ५, १२, १३ आणि १४ मधील पाण्याचा प्रश्न भीषण झाला आहे. 'कर भरा, पण तहानेले राहा' या प्रशासनाच्या धोरणाविरोधात वंचितने आज एल्गार पुकारला. मोर्चाचे नेतृत्व करणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनासमोर मागण्यांचा पाढा वाचला. हद्दवाढीतील भागात तात्काळ पाणी नियोजन करून प्रभाग १४ मधील हलगर्जीपणा करणाऱ्या दोषींवर कडक कारवाई करा. प्रभाग १४ मधील वाढीव आणि नियमबाह्य घरकर तात्काळ रद्द करून सर्वसामान्य जनतेला दिलासा द्या. पाणीपुरवठा विभागातील जे कर्मचारी कर्तव्यात कसूर करत आहेत, त्यांना तात्काळ कामावरून कमी करा. शहरात धुमाकूळ घालणाऱ्या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा आणि डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण शहरात तातडीने फवारणी करा. पात्र झोपडपट्टीधारकांना हक्काच्या घरांचा लाभ मिळवून देऊन त्यांचे पुनर्वसन करा.



हा मोर्चा म्हणजे केवळ सुरुवात असून, जर महापालिका प्रशासनाने या मागण्यांची तातडीने दखल घेतली नाही, तर अकोल्यात यापेक्षाही तीव्र आणि जहाल आंदोलन छेडले जाईल, असा थेट इशारा वंचित बहुजन आघाडीने दिला आहे. 'हा लढा केवळ पाण्यासाठी नसून अकोलेकरांच्या हक्कासाठी आणि अस्तित्वासाठी आहे,' अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. आजच्या या मोर्चाने अकोल्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, आता महापालिका प्रशासन यावर काय पाऊल उचलते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# आमदारकीच्या 6 जागांसाठी भाजपची 30 नावे

प्रतिनिधी २४ एप्रिल

**मुंबई :** विधान परिषदेच्या ६ जागांसाठी भाजपने ३० संभाव्य उमेदवारांची नावे दिल्लीला पाठवली आहेत. यापैकी एका जागेवर माजी आमदार प्रज्ञा सातव यांचे नाव जवळपास निश्चित मानले जात आहे. उर्वरित ५ जागांसाठी केशव उपाध्ये, माधवी नाईक, उपेंद्र कोठेकर, मनोज कोटक यांच्यात कडवी स्पर्धा आहे. यातून योग्य उमेदवारांची निवड करताना भाजपला कडक नियमांची चाळणी लावावी लागणार आहे. राज्यात येत्या १२ मे रोजी विधान परिषदेच्या १० जागांसाठी निवडणूक होणार आहे. त्यात विधानसभेतील संख्याबळानुसार, भाजपच्या वाट्याला सर्वाधिक ६ जागा येणार आहेत. तर सत्ताधारी शिवसेना व राष्ट्रवादीच्या वाट्याला अनुक्रमे २ व १ जागा येणार आहे. निवडून येण्यासाठी २८ मतांचा कोटा आवश्यक आहे. त्यामुळे महायुतीचे ८ आमदार सहज निवडून येतील असे चित्र आहे. याऊलट विरोधी बाकावरील महाविकास आघाडीचे संख्याबळ ४६ आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपने दिल्लीला पाठवलेल्या यादीत माधवी नाईक, उपेंद्र कोठेकर, मनोज कोटक, केशव उपाध्ये, रवी अनासपुरे, राजेश पांडे, दयाशंकर तिवारी, राम सातपुते, रणजितसिंह निंबाळकर, संजय काका पाटील, विवेक कोल्हे, जगदीश मुळीक, प्रमोद जठार, संजय केणेकर, अर्चना पाटील चाकूकर, दादाराव केचे, संजय भेंडे आदींची नावे आहेत.

# अपघातात एकाच कुटूंबातील ३ जण ठार

प्रतिनिधी २४ एप्रिल

**वाशिम :** वाशीम-मंगरूळपिर मार्गावर एका भरधाव पिकअप गाडीने समोरून जाणाऱ्या एका मोटरसायकला जोरदार धडक दिली. या घटनेत एकाच कटुबांतील तीन जण जागीच ठार झाले. हा अपघात इतका भीषण होता की, मोटरसायकलचा अक्षरशः चुराडा झाला. घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. वाशिम–मंगरूळपीर महामार्गावर भरधाव वेगाने धावणाऱ्या पीकअप वाहनाने मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. संतोष लांभाडे (४०), पत्नी कलावतीबाई लांभाडे (३५) आणि त्यांचा १२ वर्षांचा मुलगा ईश्वर लांभाडे अशी मृतांची नावे असून ते वारा जहागीर येथील रहिवासी होते. ही घटना काल संध्याकाळीच्या सुमारास घडली.



नातेवाईकांकडून परत जात असताना पारडी टकमोर फाट्यावरील चौफुलीवर हा भीषण अपघात घडला. धडक इतकी जबरदस्त होती की मोटारसायकलचा अक्षरशः चुराडा झाला आणि तिघांचाही जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर पीकअप चालकाने घटनास्थळावरून पळ काढल्याची माहिती समोर येत आहे. एकाच कटुंबातील तीन जण जागीच ठार झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# अकोल्यात 'पसायदानामृत' मासिकाच्या रामनवमी विशेषांकाचे दिमाखदार प्रकाशन

प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोला :** स्थानिक गायत्री नगर येथील माँ गायत्री प्राथमिक मराठी शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालयात रामनवमीच्या पावन पर्वावर एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी 'पसायदानामृत' मासिकाच्या 'रामनवमी विशेषांकाचे' अत्यंत उत्साहात प्रकाशन करण्यात आले. या सोहळ्यात विशेषांकाचे प्रकाशन संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. कल्पनाताई देशमुख यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विनायकराव पांडे उपस्थित होते. यावेळी 'पसायदानामृत' मासिकाचे मुख्य संपादक सुरेशजी कुलकर्णी आणि अतिथी संपादक सिद्धेश्वर देशमुख यांनी मासिकाच्या वाटचालीवर प्रकाश टाकला व उपस्थितांना मार्गदर्शन केले. संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. कल्पनाताई देशमुख यांनी मुख्य संपादकांचे अभिनंदन करून मासिकाच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी उत्स्फूर्त शुभेच्छा दिल्या. या सोहळ्याला विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप वाघ यांच्यासह शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.



उपस्थितांमध्ये सुनील चव्हाण, रामेश्वर बुंदेले, मिना कारे, कल्पना सोळंके, चंदा रोकडे, वैशाली इंगळे, किर्ती बोडखे, सुविद्या देशमुख, आरती देशमुख आणि वर्षा हिवराळे यांच्यासह विठ्ठलराव, चंद्रजित देशमुख, रणजित ठाकूर, योगेश लंगोटे व इतर कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आणि उत्साही वातावरणात संपन्न झाला.

# दरोडेखोर महिलांचा मोठा कट उधळला

प्रतिनिधी २४ एप्रिल

**सोलापूर :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात रेल्वे सुरक्षा बलाने मोठी कामगिरी बजावत मुंबई-सोलापूर सिद्धेश्वर एक्सप्रेसमध्ये दरोडा टाकण्याचा कट उधळून लावला आहे. या प्रकरणी आरपीएफने नऊ संशयित महिलांना अटक केली असून, त्यांच्याकडून अधिक तपास केला जात आहे. या कारवाईमुळे रेल्वे प्रवाशांमधून समाधान व्यक्त होत आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी कुर्डूवाडी रेल्वे स्थानकावर आरपीएफच्या सीपीडीएस पथकाने संशयास्पद हालचाली करणाऱ्या महिलांच्या एका टोळीवर लक्ष केंद्रित केले होते. सिद्धेश्वर एक्सप्रेसमध्ये दरोडा टाकण्याच्या उद्देशाने या महिला दबा धरून बसल्या होत्या. मात्र, पथकाने वेळीच झडप घालून या नऊही महिलांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या सर्व महिला आरोपी या धाराशिव जिल्ह्यातील रहिवासी आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, यातील काही महिलांवर यापूर्वी देखील रेल्वेमध्ये चोरी आणि लूटमारीचे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे. ही टोळी केवळ सोलापूरच नव्हे, तर पुणे विभागातही सक्रिय असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

# न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोला :** एम आय डी सी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गंभीर प्रकरणात अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांच्यावर स्टोन क्रशर व्यावसायिकांकडून दरमहा खंडणी मागितल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला असून प्रकरणाची चौकशी सुरू आहे. व्हाईस आणि पैशाची झालेल्या मागणीची तपास करण्यासाठी हा अटकपुर्व जामीन फेटाळण्यात आला आहे.

अकोला जिल्ह्यातील स्टोन क्रशर असोसिएशनचे सदस्य विवेक बिजवे यांनी १३ एप्रिल २०२६ रोजी [illegible] पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांनी असोसिएशनमधील प्रत्येक सदस्याकडून दरमहा १५ हजार रुपये मागितले. १९ मार्च २०२६ रोजी गायकवाड यांनी फोनवरून धमकी देत पैसे न दिल्यास स्टोन क्रशरचे काम बेकायदेशीर ठरवून बंद करण्याची कारवाई करू, असे सांगितले. त्यानंतर फिर्यादीने त्याच दिवशी त्यांच्या निवासस्थानी जाऊन १५ हजार रुपये रोख दिल्याचा आरोप आहे. त्यानंतरही इतर सदस्यांनी पैसे न दिल्याने नायब तहसीलदारांमार्फत काही ठिकाणी मोजमाप व तपासणीची कारवाई करण्यात आली. तसेच १ एप्रिल रोजी पुन्हा फोन करून गंभीर परिणामांची धमकी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. सरकारी बाजूने हा गंभीर गुन्हा असल्याचे सांगत चौकशीसाठी कोठडी आवश्यक असल्याचे न्यायालयात मांडण्यात आले. तर बचाव पक्षाने हे आरोप खोटे असल्याचा दावा केला. मात्र, न्यायालयाने प्रकरणातील आरोपांची गंभीरता लक्षात घेऊन अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला असून पुढील तपास सुरू आहे.







CMYK CMYK

## प्राथमिक आरोग्य केंद्रात वर्षभरात तिसऱ्यांदा आग

**खामगाव :** पिंपळगाव राजा येथील जुन्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीला २२ एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास पुन्हा आग लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, याच इमारतीत वर्षभरात ही तिसरी घटना असून, आग लागण्यामागील कारण अद्यापही अस्पष्ट असल्याने संशयाचे सावट निर्माण झाले आहे. इमारतीत सध्या लहान मुलांच्या लसीकरणाचे काम सुरू आहे. अशा संवेदनशील ठिकाणी वारंवार आग लागणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. रुग्णसंख्या मोठी असताना मनुष्यबळाची कमतरता असल्याचे चित्र आहे. वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांकडे आरोग्य विभाग दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. तसेच, आगीचे नेमके कारण शोधण्यात संबंधित यंत्रणा अपयशी ठरत असल्याची नाराजीही व्यक्त होत आहे. दरम्यान, ज्या ठिकाणी आग लागली त्या जुन्या इमारतीत वीज जोडणी किंवा वायरिंग नसल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी ने दिली.

# आरक्षणाआडचे 'डिलिमिटेशन'ला काँग्रेसचा विरोध

प्रतिनिधी २४ एप्रिल

**अमरावती :** काँग्रेस पक्ष कधीही आरक्षण विरोधी नव्हता, उलट देशातील महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आरक्षण देऊन सत्तेत वाटा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य कांग्रेसने केले आहे. मात्र केंद्रातील भाजप सरकार १३१ व्या घटनादुरुस्तीच्या नावाखाली महिला आरक्षणाचा केवळ बागलबुवा उभा करून देशाची दिशाभूल करत आहे. आमचा विरोध महिला आरक्षणाला नसून त्याआडून होणाऱ्या मतदारसंघांच्या पुनर्रचनेला ('डी-लिमिटेशन) आणि त्यामधून निर्माण होणाऱ्या प्रादेशिक असमतोलाला आहे, असा दावा काँग्रेसचे विधिमंडळाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. ते अमरावती येथील कांग्रेस भवन येथे गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी खासदार बळवंत वानखडे, माजीमंत्री यशोमती ठाकूर, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजीमंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी आमदार वीरेंद्र जगताप, शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले आदी उपस्थित होते.



**दक्षिण भारताच्या जागा घटवून उत्तर भारताला झुकते माप**

मतदारसंघ पुनर्रचनेवर (डी-लिमिटेशन) आक्षेप घेताना ॲड. यशोमती ठाकूर म्हणाल्या, लोकसंख्येच्या आधारावर पुनर्रचना झाल्यास लोकसंख्या नियंत्रण करणाऱ्या दक्षिण भारतीय राज्यांच्या जागा कमी होतील. उत्तर प्रदेश, बिहारसारख्या राज्यांच्या जागा ६० ते ७० ने वाढतील, तर गोव्यासारख्या राज्याची एक जागा कमी होईल. सर्व महत्त्वाचे निर्णय उत्तर भारतातील खासदार घेतील आणि असमतोल वाढेल, हीच खरी भीती आहे.

वडेट्टीवार म्हणाले, सप्टेंबर २०२३ मध्ये १०६ व्या घटनादुरुस्तीनुसार महिला आरक्षण कायदा आधीच संमत झाला. त्याला काँग्रेसने एकमुखी पाठिंबा दिला.

**महिला सक्षमीकरणाची परंपरा**

देशाची पहिली महिला राष्ट्रपती, पहिली महिला पंतप्रधान, पहिली महिला लोकसभा अध्यक्ष आणि पहिली महिला मुख्यमंत्री देणारा पक्ष हा काँग्रेसच आहे. पितृसत्ताक पद्धतीत महिलांना मालमत्तेत हक्क मिळवून देण्यापासून ते बचत गटांच्या चळवळीपर्यंत सर्व काही काँग्रेसनेच केले आहे. त्यामुळे काँग्रेस महिला विरोधी असल्याचा भाजपचा अपप्रचार हा निव्वळ ढोंगीपणा आहे, अशा शब्दात काँग्रेसचे विधिमंडळाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपच्या आरोपांचे खंडन केले.

असे असताना आता पुन्हा १३१ व्या घटना दुरुस्तीचे विधेयक मांडणे हा विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून महिलांची मते ओढण्याचा स्टंट आहे. 'नारीशक्ती वंदन अधिनियम' यात नाव आकर्षक आहे, मूळ कायद्यात या नावाचा उल्लेखही नाही.

# घातक शस्त्रासह दहशत पसरवणारा इसम शस्त्रासह ताब्यात

प्रतिनिधी २४ एप्रिल

**अमरावती :** २३ एप्रिल रोजी पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण गुन्हेशाखा अमरावती शहर यांचे आदेशाने, पोलीस आयुक्तालय हद्दीत गुन्हेगार चेकिंग व अवैदय धंदयावर कार्यवाही करणे करीता पेट्रोलींग करीत असतांना विद्यापिठ चौक अमरावती येथे गुप्त बातमीदाराकडुन खात्री लायक माहीती मिळाली कि, एक इसम हा मार्डीरोड राजुरा नाका समोरिल प्रियांशु पान कॉर्नर समोर कोयता चाकु सारखे घातक शस्त्र त्याचे ताब्यातील होरो स्पेन्डर मोटरसायकल चे सिट मधे अटकवुन गुन्हा करण्याचे उषेशाने दहशत पसरवित आहे. अशा मिळालेल्या माहीती वरून पोलीस




निरीक्षक संदिप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा येथिल पथकाने सदर इसम नामे अभिषेक गोविदराव जाधव, वय २५ वर्ष रा. गजानननगर राहूलनगरजवळ, अमरावती यास घटनास्थळी ताब्यात घेवुन त्यास विचारपुस करून नमुद त्यांचे ताब्यातुन एक कोयता चाकु, एक स्टीलचा चायना चाकु असे एकुण दोन शस्त्रे व एक हिरो स्प्लेंडर कंपनीची मोटारसायकल जप्त करून त्यांचे विरूध्द पोलीस स्टेशन फेजरपुरा येथे कलम ४/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ मपोका प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाचे नाव अभिषेक गोविंदराव जाधव, वय २५ वर्ष, रा. गजानन नगर, राहूलनगर जवळ, अमरावती असे आहे. ४२ हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

# संघटन बळकटीसाठी संस्था व्यवस्थापन कार्यशाळा मार्गदर्शक ठरली

प्रतिनिधी २४ एप्रिल

**बडनेरा:** नवी वस्ती, बडनेरा येथील सिद्धार्थ बुद्ध विहार येथे संस्था व्यवस्थापन कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

या कार्यशाळेला वसुंधरा शहरस्तर संघ, अमरावती यांच्या अध्यक्षा. सुजाता गणेश यांच्या अध्यक्षतेखाली मार्गदर्शन लाभले. शहर अभियान व्यवस्थापक भूषण बाळे व प्रफुल ठाकरे यांनी संस्थेचे प्रभावी व्यवस्थापन, संघटन कौशल्य, आर्थिक शिस्त तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ कसा घ्यावा यावर सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून अमरावती शहरस्तर संघाच्या सचिव वैशाली धुळधर उपस्थित होत्या. समुदाय संघटक प्रफुल्ल कुकडे व रेणुका कापुसकर यांनी कार्यशाळेचे नियोजन व समन्वय उत्तम प्रकारे पार पाडत सहभागी महिलांना प्रत्यक्ष अनुभवाधारित मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत आदर्श, संघिणी, जनसेवा, लोकसेवा, नवनिर्माण, बुद्धछाया, आधार, सौमित्र, सावित्री, संकल्प, नारीशक्ती, संविधान, सहेली आदी विविध वस्तीस्तर संघांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. प्रत्येक संघातून महिला सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

तसेच समुदाय संसाधन व्यक्ती (ऍ॑झ्र) म्हणून किरण दुपारे, जयश्री गडेकर, योगिता वडुरकर, रुपाली हजारे, कुंदा मेश्राम, वंदना पवार, मनाली इंगळे, मोनाली सदावर्ते, मेघा ओगले, प्राजक्ता गोबरे, उमा इंगोले, रमा मोहोड यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

कार्यशाळेत संघ नोंदणी प्रक्रिया, बैठकींचे प्रभावी नियोजन, लेखा व्यवस्थापन, बचत गटांचे सशक्तीकरण, तसेच संघांच्या माध्यमातून उपजीविका व स्वावलंबनाच्या संधी निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला. सहभागी महिलांनी आपल्या अडचणी मांडून त्यावर मार्गदर्शकांकडून समाधानकारक उत्तरे मिळवली. यावेळी अध्यक्ष मा. सुजाताताई गणेश यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ङ्खमहिलांचे सशक्तीकरण सक्षम व संघटित संस्थांमधूनच साध्य होऊ शकते. वस्तीस्तर संघांनी एकजुटीने कार्य केल्यास समाजात सकारात्मक बदल घडवता येतो. अशा कार्यशाळा महिलांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्यास व आत्मविश्वास वाढविण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. कार्यशाळेचे प्रास्ताविक प्राजक्ता गोबरे यांनी केले, संचालन उमा इंगोले यांनी प्रभावीपणे पार पाडले, तर आभारप्रदर्शन किरण दुपारे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी किरण दुपारे व जयश्री गडेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी भविष्यात अधिक सखोल व विस्तृत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

# महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक: अमरावती जिल्ह्यात २६ एप्रिल रोजी मतदान

प्रतिनिधी २४ एप्रिल

**जिल्हाधिकाऱ्यांचे मतदानाचे आवाहन**

**अमरावती:** महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या (एमएमसी) ९ सदस्यांच्या निवडीसाठी निवडणूक कार्यक्रम घोषित झाला असून, अमरावती जिल्ह्यात येत्या २६ एप्रिल २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. जिल्ह्यातील एकूण २ हजार ५६५ नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक मतदारांसाठी प्रशासनाकडून ४ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली असून, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जास्तीत जास्त संख्येने मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले आहे.

अवर सचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांनी जारी केलेल्या राजपत्रानुसार ही निवडणूक होत आहे. अमरावती जिल्ह्यातील मतदानासाठी श्रीकृष्ण पेठ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जिल्हा स्त्री सामान्य रुग्णालय परिसर) येथे व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये फिजीऑलॉजी प्रॅक्टिकल हॉल क्रमांक १ आणि २ मध्ये प्रत्येकी दोन याप्रमाणे एकूण ४ मतदान केंद्रे असतील. केंद्र क्रमांक १ मध्ये १ ते ६४४, केंद्र क्रमांक २ मध्ये ६४५ ते १२८२, केंद्र क्रमांक ३ मध्ये १२८३ ते १९२५ आणि केंद्र क्रमांक ४ मध्ये १९२६ ते २५६५ या अनुक्रमांकाचे मतदार आपले मतदान करू शकतील.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी ५ मतदान पथके नियुक्त करण्यात आली असून, यामध्ये एकूण २५ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण पार पडले असून द्वितीय प्रशिक्षण २५ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात होणार आहे. हे कर्मचारी २५ एप्रिल रोजी सकाळी ११:३० वाजता निवडणूक साहित्यासह केंद्रांकडे रवाना होतील. २६ एप्रिल रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान होईल. प्रत्येक मतदाराला एकूण ९ मते देण्याचा अधिकार देण्यात आला आहे. मतदानासाठी ओळख पटविण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र किंवा ओळखपत्र सादर करणे अनिवार्य आहे. याव्यतिरिक्त आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन चालक परवाना, पासपोर्ट किंवा निवडणूक आयोगाने मान्यता दिलेली इतर छायाचित्रित ओळखपत्रेही ग्राह्य धरली जातील. विवाहित महिला मतदारांच्या नावामध्ये बदल असल्यास त्यांनी नाव बदलल्याचा पुरावा सोबत ठेवणे आवश्यक आहे. मतदारांना सुलभतेसाठी प्रशासनाने क्यूआर कोडची (QR Co) सुविधा उपलब्ध करून दिली असून, तो स्कॅन करून मतदारांना मतदार यादीतील आपला अनुक्रमांक शोधता येणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व डॉक्टरांनी या निवडणूक प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

# सर्वोत्कृष्ट कल्पना उपक्रमांतर्गत विभागीय आयुक्त कार्यालयास राज्यस्तरीय पुरस्कार

प्रतिनिधी २४ एप्रिल

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुंबईत सत्कार व पुरस्कार वितरण**

**अमरावती:** राज्य शासनाच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानात सर्वोत्कृष्ट कल्पना/ उपक्रमांर्तगत 'बिंदू नामावली सॉफ्टवेअर' विकसित केल्यासाठी तृतीय पुरस्कार विभागीय आयुक्त कार्यालयातील मागासवर्ग कक्षाच्या सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबई येथे मंगळवारी (ता. २१ एप्रिल) प्रदान करण्यात आला.

नागरी सेवा दिन २०२६ आणि 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा २०२५-२६' अंतर्गत पारितोषिक वितरण सोहळा २१ एप्रिल रोजी, मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे झाला. कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकजकुमार तसेच पुरस्कारार्थी यावेळी उपस्थित होते. श्रीमती पाथरे यांच्यासह मागासवर्ग कक्षाचे सहा.महसूल अधिकारी सुजन सोळंके, दत्तात्रय हातेकर यांनी सदर पुरस्कार स्विकारला.




विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मागासवर्ग कक्षाव्दारे विकसित करण्यात आलेल्या 'बिंदू नामावली सॉफ्टवेअर' मुळे रोस्टर्स तयार करण्याची प्रक्रिया सुलभ झाली आहे. यामुळे शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्थामधील कर्मचाऱ्यांची आरक्षणनिहाय अचूक माहिती तयार होत असून १०० बिंदूनामावली नोंदवही संगणीकृत पध्दतीने संबंधित कार्यालयास उपलब्ध होते. या सॉफ्टवेअरमध्ये कार्यालयाच्या आस्थापनेवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती प्रर्वगानुसार सर्व माहिती विहित नमून्यात नोंदविली जाते. तसेच यात नियुक्ती प्रर्वगाचे आदेश, जात वैधता प्रमाणपत्र आदी आवश्यक दस्तावेज अपलोड करण्याची सुविधा दिली असल्यामुळे अचूक डेटा तयार होतो.

प्रत्येक भरती वर्षात बिंदूनामावली अद्ययावत करावयाची असल्यामुळे पुन्हा पुन्हा सर्व कर्मचाऱ्यांची माहिती गोळा करणे व नोंदवहीत लिहून काढण्याची आवश्यकता राहत नाही. बिंदुनामावलीत बिंदूच्या क्रमानुसार १ बिंदू क्रमांक नोंद झाल्यानंतर लगेच दुसरा बिंदू कार्यरत होतो, त्यामुळे बिंदूचा क्रम चुकत नाही. या 'बिंदू नामावली सॉफ्टवेअर' मुळे अमरावती विभागातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्थामध्ये नोकरभरती व पदोन्नती, अनुकंपाची प्रकरणे लवकर मार्गी लागण्यासाठी सुविधा उपलब्ध झाली आहे.

**अमरावती महापालिकेला 'कूल रुफ' संकल्पनेला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार**

महानगरपालिका स्तरावरून थेट प्रस्तावअंतर्गत 'कूल रुफ'करिता तत्कालिन आयुक्त सौम्या शर्मा आणि अमरावती मनपा आयुक्त वर्षा लड्डा यांना प्रथम पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला.

# आदिवासी विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेत प्रवेशाबाबत सूचना

**इयत्ता पहिलीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु, ३० मे अंतिम मुदत**

प्रतिनिधी २४ एप्रिल

**अमरावती :** धारणी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमातील नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता पहिलीमध्ये (सन २०२६-२७) प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक पालकांना २७ एप्रिल २०२६ पासून प्रकल्प कार्यालय धारणी तसेच त्याअंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय आश्रमशाळांमध्ये विनामूल्य अर्ज उपलब्ध होणार आहेत. प्रकल्प कार्यालयाद्वारे पात्र विद्यार्थ्यांची निवड करून वरिष्ठ कार्यालयाच्या मंजुरीनंतर निश्चित शाळांमध्ये प्रवेश दिला जाणार आह, असे प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी सिध्दार्थ शुक्ला यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याने अनुसूचित जमातीचा असणे आवश्यक असून, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपर्यंत असावे. विद्यार्थ्याचे वय किमान ६ वर्षे पूर्ण असणे गरजेचे आहे. अर्जासोबत जातीचा दाखला, जन्मतारखेचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, आधारकार्ड, वैद्यकीय प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. निवासी शाळांमध्ये प्रवेशासाठी दारिद्र्यरेषेखालील, आदिम जमातीतील तसेच विधवा, घटस्फोटीत किंवा निराधार पालकांच्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे.

प्रवेश अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३० मे २०२६ असून, त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अपूर्ण किंवा चुकीची माहिती दिल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना एकदा शाळा निश्चित झाल्यानंतर शाळा बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. त्यामुळे पात्र पालकांनी सर्व अटी व शर्ती पूर्ण करून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज वेळेत सादर करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी शुक्ला यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट — बुलढाणा

# खामगाव तालुक्यात वाढले अवैध वीटभट्ट्यांचे जाळे!

प्रतिनिधी २४ एप्रिल

**पर्यावरणाच्या हानीसह आरोग्यासही धोका**

**खामगाव:** तालुक्यात गेल्या काही काळापासून विटांच्या व्यवसायाला मोठी चालना मिळाली असली, तरी त्याचवेळी नियमबाह्य वीटभट्ट्यांचे जाळेही झपाट्याने वाढत असल्याचे वास्तव समोर येत आहे. ज्ञानगंगा नदीकाठ, लाखनवाडा, हिवरखेड रोड, पळशी तसेच पिंपळगाव राजा परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध वीटभट्ट्या असून, पर्यावरण व नागरिकांच्या आरोग्यावर त्याचे गंभीर परिणाम होत आहेत.

तालुक्यात सुमारे १५० ते २०० वीटभट्ट्या असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. ज्ञानगंगा नदीच्या पात्रातील वाळू व काठावरील मातीचा वापर करून या भट्ट्या उभारल्या जात असल्याचे दिसून येते. तसेच अकोला-नांदुरा महामार्ग व हिवरखेड रोडलगत शेतजमिनींचा बिगरशेती वापर न करता व्यवसायासाठी वापर होत असल्याचेही निदर्शनास आले आहे.

**नागरिकांची मागणी**

या पार्श्वभूमीवर अवैध वीटभट्ट्यांवर तातडीने कारवाई करून पर्यावरणाचे संरक्षण करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**धुरामुळे वायूप्रदूषणाचा धोका**

भट्ट्यांमधून निघणाऱ्या धुरामुळे परिसरातील हवेची गुणवत्ता खालावत आहे. काही ठिकाणी इंधन म्हणून टायर, प्लास्टिक किंवा कचरा जाळला जात असल्याची तक्रार आहे.

त्यामुळे आरोग्यास अपायकारक वायू वातावरणात मिसळून श्वसनासंबंधी आजार वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तसेच नियमानुसार उंच चिमण्या नसल्याने धूर थेट वस्ती व शेतीपर्यंत पोहोचत असल्याचेही दिसते.

# पिण्याच्या पाण्यासाठी महिलांचे पाणीपुरवठा अभियंता कार्यालयातच उपोषण

प्रतिनिधी २४ एप्रिल

**मलकापुर:** शहरातील संत ज्ञानेश्वर नगर ,सातव प्लॉट प्रभाग क्रमांक १५ मध्ये गेल्या आठ महिन्यापासून पंधरा ते वीस घरांना पाणी येत नाही, पाणीपुर वठा अभियंता बयेस यांना बऱ्याच वेळा विनंती करूनही पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही, नळाला पाणी येत नाही त्यामुळे महिलांना उन्हातान्हात दुरून डोक्यावर पिण्याच्या पाण्यासाठी चांडक विद्यालयाजवळील पाणीपुरवठा विभागाकडे यावे लागते व पाणी एक ते दीड कि.मी.डोक्यावर आणावे लागत आहे, आमच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही आज पाणीपुरवठा अभियंता बयैस यांच्या कार्यालयात आमरण उपोषणास सुरुवात केली आहे व जोपर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार नाही तोपर्यंत आम्ही उपोषण सोडणार नाही असा इशारा माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक ॲड. हरीश रावळ, अनिल बगाडे, पांडुरंग जगताप, गोपाल कावस्कर,कमलबाई भोपळे, शोभाबाई वावगे, लताबाई



ईसाळकर,जिजाबाई जगताप, मंजुळाबाई देविकार, शारदाबाई जगताप, लक्ष्मीबाई वायडे,सरलाबाई वायडे, उषाबाई खराटे, जान्हवी वायडे, विशाल भोपळे, गणेश खराटे, चंदू वायडे,छोटूभाऊ ईसाळकर, विजय वायडे, हरी कावस्कर,गोपाल वावगे, सागर जोशी, गणेश भोपळे, राहुल वायडे, भाग्यश्री वायडे, कैलास वायडे सह आदी महिला पुरुषांनी आमरण उपोषणास सुरुवात केली आहे.

सिटी न्यूज अकोला
शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# रविकांत राठोड यांना विधानपरिषदेत संधी द्यावी; बंजारा समाजाची मागणी



**अकोला:** विधानपरिषद निवडणूक मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडून बंजारा समाजाला संधी मिळावी अशी सर्व बंजारा समाजाकडून मागणी होत आहे. रविकांत राठोड सारख्या तरुण व तडफदार कणखर नेतृत्व असलेल्या तरुणाला संधी द्यावी. मागील विधानसभा क्षेत्रात जिथे जिथे रविकांत राठोड यांनी प्रचार केला तिथून महायुतीचे असंख्य उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून आले आहेत आणि महानगरपालिकेमध्ये पण त्यांनी प्रचंड प्रयत्न केलेले आहेत. अशा दमदार नेतृत्वाला राष्ट्रवादी काँग्रेस ने उमेदवारी देऊन बंजारा समाजाला न्याय द्यावा न्याय दिलास बंजारा समाज खंबीरपणे राष्ट्रवादी काँग्रेस सोबत राहील. राष्ट्रवादी काँग्रेस चे विमुक्त प्रदेशाध्यक्ष तथा बंजारा ब्रिगेड भारत राष्ट्रीय अध्यक्ष व संस्थापक रविकांत राठोड यांना विधान परिषद उमेदवारी जाहीर करावी अशी मागणी बंजारा ब्रिगेड जिल्हाध्यक्ष रतन आडे यांनी सर्व अकोला जिल्हा पदाधिकारी च्या वतीने विनंती केली आहे.

## अक्षयतृतीयेच्या निमित्ताने शिवरमध्ये अन्नदान वाटप



**अकोला:** सण म्हणजे केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नव्हे, तर समाजातील गरजूंच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याची संधी असते, याचा प्रत्यय शिवर येथे पुन्हा एकदा आला. ङ्घगरजू व्यक्तींना रक्तदान, अन्नदान वाटप मंडळ शिवरङ्ग यांच्या वतीने अक्षयतृतीया निमित्त गोरगरीब व जेष्ठ नागरिकांना किराणा किट व कपड्यांचे दारपोच वितरण करून माणुसकीचा अनोखा आदर्श घालून दिला.

या उपक्रमात केवळ वस्तूंचे वाटप झाले नाही, तर अनेक गरजूंच्या डोळ्यात समाधानाचे अश्रूही पाहायला मिळाले. 'कोणी तरी आपलं आहे' ही भावना त्यांच्या मनात निर्माण झाली, हेच या कार्याचे खरे यश ठरले.

# उमरा देशमुख येथे सिलिंडर स्फोटाने घर जळून खाक

प्रतिनिधी २४ एप्रिल

**आलेगाव:** पातुर तालुक्यातील उमरा देशमुख येथे २३ एप्रिल रोजी दुपारी सिलिंडर स्फोटाच्या घटनेत काका-पुतण्याचे घर जळून खाक झाले. समाधान चुंडे आणि भागवत चुंडे यांच्या मालकीचे घर काही क्षणातच आगीच्या भक्ष्यस्थानी पडले असून, या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.



प्राथमिक माहितीनुसार, दुपारच्या वेळी घरात स्वयंपाक सुरू असताना अचानक गॅस सिलेंडरमधून गळती होऊन जोरदार स्फोट झाला. स्फोटानंतर क्षणातच घराला आग लागली आणि काही मिनिटांतच संपूर्ण घर ज्वाळांनी वेढले गेले. आगीची तीव्रता इतकी होती की घरातील भांडी, कपडे, धान्य, फर्निचर तसेच सर्व महत्त्वाची कागदपत्रे जळून खाक झाली. कुटुंबीयांना काहीच सावरण्याची संधी मिळाली नाही.

घटनेची माहिती मिळताच गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांनी पाणी व इतर साधनांच्या सहाय्याने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच मोठ्या संख्येने नागरिक घटनास्थळी उपस्थित होते. स्थानिकांच्या अथक प्रयत्नांनंतर काही वेळाने आग नियंत्रणात आणण्यात यश आले, मात्र तोपर्यंत घर पूर्णपणे जळून गेले होते.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी संबंधित कुटुंबाचा संपूर्ण संसार उद्ध्वस्त झाला आहे. अचानक घडलेल्या या दुर्घटनेमुळे कुटुंबीयांवर मोठे आर्थिक व मानसिक संकट कोसळले आहे. त्यांच्या समोर आता निवारा आणि उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या घटनेनंतर ग्रामस्थांकडून प्रशासनाने तातडीने घटनास्थळी पंचनामा करून नुकसानग्रस्त कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी, तसेच त्यांना तात्पुरता निवारा, अन्नधान्य व जीवनावश्यक साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशी जोरदार मागणी होत आहे. तसेच या घटनेची सखोल चौकशी करून भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी योग्य ती उपाययोजना करावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

## पत्रकार विशाल पुरंदरे यांचा सन्मान



प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोला:** युवा पत्रकार तसेच सकारात्मक पत्रकारिता वाढीस लागावी या दृष्टीने सदैव प्रयत्न करणारे विशाल पुरंदरे यांचा सिने अभिनेता मकरंद अनासपुरे व खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पत्रकारितेच्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. गेली दोन अडीच दशके विशाल पुरंदरे पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. विविध विषयांवर लेखन करून त्यांनी ठसा उमटवला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार त्यांना मिळाला. अनेकांनी त्यांच्या यशाचे कौतुक केले. दर्यापूरमध्ये नुकताच हा कार्यक्रम झाला.

## अकोटमध्ये श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राकडून अन्नदान

वि.प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोट:** श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त अकोट येथील यशोदा नगर स्थित श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास बालसंस्कार केंद्र (दिंडोरी प्रणित) तर्फे अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर येथे सुरू असलेल्या अन्नछत्रासाठी अकोट केंद्राच्या वतीने अन्नधान्य पाठविण्यात आले.



यामध्ये २४ कट्टे गहू, १ कट्टा साखर, १ तेलाचा डबा, १ कट्टा तूरडाळ तसेच इतर आवश्यक अन्नसाहित्याचा समावेश असून, गुरुपीठातून आलेल्या सेवेकऱ्यांच्या मार्फत हे साहित्य सुपूर्द करण्यात आले.

या वेळी सेवा केंद्रातील सेवेकरी शोभाताई बोडखे, केशवराव बोडखे, प्रवीण अढाउ, संजय सदार, पप्पू पाटकर, विद्याधर वाकोडे, नागे, शुभम काळे, हर्षल ढगे, ओमप्रकाश बोके, आशुतोष खडेकर, अमोल गावंडे आदी उपस्थित होते.

या अन्नदान उपक्रमामुळे चालणाऱ्या अन्नछत्रास मोठा हातभार लागणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## निधन वार्ता

### ज्ञानेश्वरराव बांबल



**मुर्तिजापुर:** तालुक्यातील सिरताळा येथील रहिवासी ज्ञानेश्वरराव पूर्णाजी बांबल यांचे २३ एप्रिलला वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी आणि मोठा आप्तपरिवार आहे.

# कराल वसुंधरेचे संरक्षण, वाचेल जीवन : डॉ. मनीषा मते

◆ धारणी फाउंडेशनच्या वतीने वसुंधरा दिनाला वृक्ष लागवड व खत निर्मिती

प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोट:** अकोट शहरामधील स्थानिक गीताबाई पोटे विद्या मंदिर अकोट येथे धारिणी फॉउंडेशन माजी नगराध्यक्ष डॉ. मनीषा मते वतीने साजरा करण्यात आला पृथ्वी म्हणजे आपली माता तिचे रक्षण करणे आपली कर्तव्य व जबाबदारी आहे. पृथ्वी वरील वाढता कचरा, अनावशक प्लास्टिक वस्तूंचा अतिवापर टाळणे, पातळ प्लॅस्टिक ला बाय बाय करणे, त्यासोबत हवा पाणी प्रदूषण वाढलेले आहे, ई कचरा व प्लास्टिक वापर टाळणे, कमी करणे डम्पिंग ग्राऊंड वर जाणारा ओला सुका कचरा कमी करणे,



खत निर्मिती पुनर वापर, रिसायकलिंग होणे गरजेचे आहे वृक्ष ही आपले जीवन, श्वास आहेत. जास्तीत जास्त वृक्ष लावून संवर्धन केले तर आपल्याला चांगले आरोग्य, पाणी, वीज मिळेल या संकल्पनेतून धारिणी फॉउंडेशन कार्य करीत आहे. वृक्षारोपण नंतर लगेच ओला सुका कचरा मोठा खड्डा करून त्यात टाकण्या साठी शाळेच्या परिसरात सुरुवात करण्यात आली भाऊसाहेब पोटे शिक्षण संस्थेच्या सचिव प्रा.मेघना पोटे यांचे सहकार्या व सहभागा मुळे वसुंधरा दिना निमित्य वृक्ष रोपण खत निर्मिती प्रोजेक्ट कार्यक्रम खूप छान पार पडला मुख्याध्यापिका गावंडे मॅडम, सहकारी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला लताताई चिकटे, अर्चना काळे, संजीवनी कविटकर, वर्षा मानकर, भारती काटोले, अर्चना सावरकर, वैशाली, बाभुळकर, माकोडे मॅडम, दीपिका लेबडे, दुर्गा उदगीरकर, पाचूरकर, व शाळेतील विध्यार्थी चा सहभाग लाभला. सर्व विध्यार्थ्यांना खाऊ वाटप करून सांगता झाली.

# जनगणना २०२७ अंतर्गत तालुक्यात पर्यवेक्षक व प्रगणक प्रथम टप्पा प्रशिक्षणाचे उद्घाटन

प्रतिनिधी २४ एप्रिल

**मुर्तीजापुर :** जनगणना २०२७ अंतर्गत मुर्तिजापूर तालुक्यात पर्यवेक्षक व प्रगणक यांचे प्रथम टप्पा प्रशिक्षणाचे उद्घाटन उपविभागीय चार्ज अधिकारी मुर्तिजापूर यांचे हस्ते भारतीय ज्ञानपीठ विद्यालय मुर्तिजापूर येथे पार पडले.



भारत सरकारतर्फे महाराष्ट्र राज्यात घरसूची आणि गृहगणना लवकरच सुरु होणार आहे. यासाठी पुर्वतयारीचा भाग म्हणून आज २३/०४/२०२६ रोजी सकाळी ०९.३० वाजता भारतीय ज्ञानपीठ विद्यालय मुर्तिजापूर येथे जनगणना २०२७ अंतर्गत नियुक्त पर्यवेक्षक व प्रगणक यांचे प्रथम टप्पा प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी संदिपकुमार अपार यांचे हस्ते पार पडले. यावेळी तहसिलदार शिल्पा बोबडे, नायब तहसीलदार रविंद्र राऊत व नायब तहसीलदार दिनेश सोनोने यावेळी उपस्थित होते. जनगणना २०२७ मूर्तिजापूर ग्रामीण करीता एकूण २७१ प्रगणक व ५० पर्यवेक्षक नियुक्त केले आहेत.

प्रथम टप्पा प्रशिक्षण सत्रात १०० प्रगणक व पर्यवेक्षक यांना जनगणना २०२७ बाबत प्रशिक्षण देण्यात येत आहे. सदरचे प्रशिक्षण तीन टप्प्यात दिनांक ७ मे २०२६ पर्यंत घेण्यात येणार आहे. जनगणना २०२७ अंतर्गत घरयादी व घरगणना (पहिला टप्पा) राबविण्यात येत आहे. याअंतर्गत स्व-गणना १ ते १५ मे २०२६ पर्यंत करता येणार आहे. ज्यामध्ये नागरीकांना त्यांची माहिती स्वतः ऑनलाईन भरता येणार आहे. अधिकृत पोर्टल भेट द्या, तुमच्या मोबाईल क्रमांक वापरून OTP व्दारे लॉग-इन करा, तुमचे राज्य, जिल्हा आणि स्थानिक तपशिल निवडा,

डिजीटल नकाशावर तुमच्या घराचे स्थान चिन्हांकित करा, घर आणि कुटूंबाशी संबंधित माहिती भरा, अर्ज सादर केल्यानंतर तुम्हाला SEID मिळेल, SEID सुरक्षित ठेवा, प्रगणक भेटायला आल्यावर त्यांना SE ID द्या, प्रगणक माहितीची पडताळणी करतील.

तसेच १६ मे ते दिनांक १४ जून २०२६ मध्ये प्रगणकाव्दारे घर गणना प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. जनगणना अधिनियम १९४८ च्या कलम (८) उपकलम (१) अंतर्गत खालील ३३ प्रश्न विचारले जातील. जनगणना २०२७ अंतर्गत नियुक्त प्रगणक यांना सहकार्य करून याबाबत माहिती देणेसाठी सर्व मुर्तिजापूर तालुक्यातील नागरीकांना याव्दारे तालुका प्रशासनाचे वतीने आवाहन करण्यात येत आहे.

## अकोल्यात राज्यस्तरीय कर्तृत्व शिखर महिला रत्न पुरस्कार २०२६ सोहळा दिमाखात संपन्न

**अकोला:** अकोल्याच्या ॲड. राणी शंकरराव वाकडे यांना राज्यस्तरीय महिला रत्न पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. युवा विचारपीठ अकोलाने आयोजन केले होते. प्रमिलाताई ओक हॉलमध्ये झाला. महापौर सौ. खेडकर, मा. बी. चंद्रकांत रेड्डी सर, (अप्पर पोलीस अधीक्षक अकोला ),आरटीओ त्रिवेणी घोलप तसेच आयोजक युवा विचारपीठ चे अध्यक्ष निलेश ठाकरे,उपाध्यक्ष सौ. स्मिता अग्रवाल, मुख्याध्यापक मनोज देशमुख आणि संपूर्ण कार्यरत टीम इत्यादी उपस्थित होते. हा पुरस्कार मिळाल्याने सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रात कार्य करत



असलेल्या महिलांसाठी राज्यस्तरावर कौतुकाची प्रामाणिक थाप युवा विचारपीठ अकोला यांनी पुरस्कृत महिलांना दिल्याबद्दल मनस्वी आभार आणि पुढील वाटचालीसाठी अविरत कार्य करण्याची जिद्द कायम तेवत राहणार आहे.

## क्रीडा संकुलातील बेफिकिरीचा कळस; खेळाडू संतप्त, आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी २४ एप्रिल

**तेल्हारा:** शहर व ग्रामीण भागातील शेकडो खेळाडू दररोज सकाळ-संध्याकाळ क्रीडा संकुलात सरावासाठी हजेरी लावतात. मात्र, येथे मूलभूत सुविधांचाही पूर्णपणे अभाव असल्याने खेळाडूंमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. उन्हाळ्याचा कडाका दिवसेंदिवस वाढत असताना, क्रीडा संकुलात थंड पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था नाही. नादुरुस्त ग्रीझरमुळे खेळाडूंना गरम पाणी पिण्याची वेळ येत असून, त्यामुळे त्यांच्या आरोग्यावरही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून याकडे पूर्ण दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप खेळाडूंनी केला आहे. इतकेच नव्हे, कबड्डी सरावासाठी आवश्यक असलेली मातीही उपलब्ध करून दिली जात नसल्याने खेळाडूंना अडचणींचा सामना करावा लागत आहे. योग्य सुविधा नसल्यामुळे अनेक होतकरू खेळाडूंचा सराव खंडित होत असून, त्यांच्या भवितव्याशी खेळ होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, क्रीडा संकुलातील कर्मचारी नियमितपणे हजर राहत नसल्याने परिसरात कोणीही मुक्तपणे ये-जा करत आहे. त्यामुळे सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून, कोणतीही अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. 'खेळाडूंच्या मूलभूत गरजांकडे इतके दुर्लक्ष का?' असा सवाल उपस्थित करत खेळाडूंनी प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला आहे. यासंदर्भात खेळाडूंनी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन देत, दोन दिवसांत सर्व समस्या सोडवाव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. आता प्रशासन जागे होणार का, की खेळाडूंना रस्त्यावर उतरावे लागणार? असा प्रश्न नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे.

## मुस्लिम समाजाचे वतीने सीबीएसईसीच्या परीक्षेत तालुक्यात प्रथम आलेल्या सर्वेश ठाकरेचा सत्कार



प्रतिनिधी २४ एप्रिल

**मुर्तीजापुर:** मुस्लिम समाजाचे वतीने सीबीएसईच्या परीक्षेत तालुक्यातून प्रथम येण्याचा मान मिळवणारे सर्वेश प्रमोद ठाकरे यांचा सत्कार करण्यात आला. सर्वेश ठाकरे यांनी या परीक्षेत ९७.२ टक्के गुण प्राप्त केले. ठाकरे परिवारांचे संस्कार आणि मिळालेले शिक्षकांचे मार्गदर्शन सर्वेश साठी वरदान ठरले आहे प्राध्यापक प्रमोद ठाकरे यांचा सुद्धा सत्कार शाल आणि पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला शिक्षणाचा काय महत्त्व असतो त्यासाठी भविष्यात विद्यार्थ्यांना कोणत्या रीतीने अभ्यासाकडे वळावे यासंदर्भात व आपल्या परिवाराकडून मिळालेल्या संस्कार जपून जीवनात केलेले कार्य महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रतिपादन पत्रकार अन्वर खान यांनी केले यावेळी जमाते इस्लामी संघटना सय्यद जुनेद, अन्वर खान, शेख रफिक, मोहम्मद शरीफ कुरेशी मोहम्मद रिजवान सिद्दिकी उज्वल ठाकरे रियासत बावा शेख समीर उपस्थित होते.

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME **LEELAMMA GEORGE** (OLD PASSPORT) TO NEW NAME **LEELAMMA KAVALAYIL PHILIPS.** I HAVE COUNTINUE THIS NAME. **ADDRESS. OPP SBI COLONY, N0.5 LAHAN UMARI, AKOLA.**

# वारकरी संप्रदायातील 'घुसखोर' ठरवण्याचा अधिकार विकास लवांडेला कुणी दिला?

◆ हिंदू जनजागृती समितीचा सवाल

प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोला :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) प्रवक्ते विकास लवांडे यांनी वारकरी संप्रदायातील २० 'घुसखोर' लोकांची सूची प्रसारित करून स्वतःच्या आणि त्यांच्या पक्षाची वैचारिक दिवाळखोरी घोषित केली आहे. विठ्ठलाच्या भक्तीचा एक भाग असणारी वारी, जिला ८०० वर्षांपेक्षा अधिक काळ संतांचा वारसा लाभला आहे, त्यात अमूक लोक 'घुसखोर' आहेत, हे ठरवण्याचा अधिकार विलास लवांडे आणि त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला कुणी दिला? असा सवाल





हिंदू जनजागृती समितीच्या पत्रकार परिषदेत करण्यात आला.

वारकरी संप्रदायावर करण्यात आलेले आरोप हे हिंदू संतांवरील, हिंदुत्वावरील, धर्मावरील आरोप आहेत, असेच आम्ही मानतो. हे आरोप करून हिंदू समाजात दुही माजवण्याचा आणि संतपरंपरेचा अवमान करण्याच्या षड्यंत्रपूर्वक केलेल्या प्रयत्नाचा आम्ही निषेध करतो, तसेच 'विकास लवांडे यांना तात्काळ अटक करा', अशी या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून आम्ही शासनाकडे मागणी करतो, अशी भूमिका हिंदू जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड संघटक सुनील घनवट यांनी या वेळी मांडली. या प्रसंगी हिंदु जनजागृती समितीचे विदर्भ समन्वयक श्रीकांत पिसोळकर, हिंदू राष्ट्र समन्वय समितीचे संयोजक उदय महा, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा अध्यक्ष राजूभाऊ मंजुळेकर, पुरातन महादेव मंदिराचे अध्यक्ष अरविंद देठे, वारकरी संप्रदायाचे ह.भ.प. उमेश महाराज, संजय ठाकूर, अधिवक्ता पप्पू मोरवाल उपस्थित होते.

वारी ही आमची संतपरंपरेचा, विठ्ठलाच्या भक्तीचा भाग आहे. वारी 'सेक्युलर' नसून ती 'धार्मिक परंपरा' आहे. या परंपरांवर आघात करण्यासाठी होत असलेले प्रत्येक प्रयत्न आपण हाणून पाडले पाहिजेत. प्रत्येक वारकरी बांधव, ह.भ.प., यांसह प्रत्येक श्रद्धाळू हिंदूने यामध्ये पुढाकार घ्यायला हवा. आपल्या धर्मावर होणाऱ्या आघातांच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी संघटित व्हायला हवे, असे आवाहन आम्ही करतो. तसेच आम्ही सर्व हिंदुत्वनिष्ठ संघटना वारकरी संप्रदायाच्या परंपरा अबाधित राखण्यासाठी, तसेच वारीतील 'अर्बन नक्षलवाद्यां'च्या घुसखोरीला रोखण्यासाठी कटिबद्ध आहोत. आमची राज्य सरकारकडे मागणी आहे की, विकास लवांडे यांनी वारकरी संप्रदायाची जाहीर क्षमा न मागितल्यास त्यांना त्वरित अटक करावी अशी मागणी केली.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226

**मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय**

गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार

वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा



पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# वृद्ध इसमाचा गळा दाबून खून

## पैशांच्या वादातून हत्याकांड : बोथा येथील घटना

प्रतिनिधी २४ एप्रिल



**यवतमाळ :** पैशांची देवाण-घेवाण आणि ट्रॅक्टरच्या अवजारांवरून निर्माण झालेल्या वादातून एका ७५ वर्षीय वृद्धाचा गळा दाबून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना बोथा (सा) येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणात पोफाळी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दोन संशयितांना घटनास्थळावरूनच ताब्यात घेतले आहे.

मृत दौलत रामा गव्हाणे (वय ७५, रा. बोथा) हे गावात एकटे राहत होते. फिर्यादी नातू रजनीश कैलास गव्हाणे यांच्या माहितीनुसार, आरोपी परमेश्वर साहेबराव मोरे (वय ३०) याने मृतांकडून ट्रॅक्टरची अवजारे वापरण्यास घेतली होती तसेच वेळोवेळी रोख रक्कमही घेतली होती. या व्यवहारावरून दोघांमध्ये गेल्या काही दिवसांपासून वाद सुरू होता. दि. २३ एप्रिल रोजी रात्री सुमारे १०.३० वाजता घर बाहेरून बंद असल्याची माहिती मिळाल्यानंतर नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. घराला बाहेरून कडी लावलेली असल्याचे दिसून आले. त्यानंतर पोफाळी पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनी ग्रामस्थांच्या मदतीने घराचा दरवाजा उघडला असता दौलत गव्हाणे हे खाटेवर मृत अवस्थेत आढळले. घराची तपासणी केली असता आतील खोलीत लपून बसलेले परमेश्वर मोरे (वय ३०) आणि विनोद कोंडबा गव्हाणे (वय २५) हे दोघे सापडले. त्यांना ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक तपासानुसार, घेतलेले पैसे व ट्रॅक्टर अवजारे परत करण्यासाठी मृतांनी केलेल्या तगाद्यामुळे रागातून आरोपींनी संगनमत करून रात्रीच्या सुमारास वृद्धाचा गळा व तोंड दाबून खून केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. दौलत गव्हाणे यांना पुसद येथील शासकीय रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. या प्रकरणी पोफाळी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# अवैध गॅस सिलेंडर साठ्यावर धाड; ३० गॅस सिलेंडर जप्त

प्रतिनिधी २४ एप्रिल



**यवतमाळ :** शहर पोलिसांनी सुरजनगर परिसरात अवैध गॅस सिलेंडर साठ्यावर धाड टाकुन ३० गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले. या प्रकरणी तिघांविरुद्ध अत्यावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ एप्रिल रोजी गोपनीय माहितीच्या आधारे धामणगाव रोडवरील सुरजनगर येथील एका भाड्याच्या घरावर तहसील कार्यालयाच्या पथकासह संयुक्त कारवाई करण्यात आली. छाप्यात २८ घरगुती व २ व्यावसायिक असे एकूण ३० गॅस सिलेंडर आढळून आले. विविध कंपन्यांच्या या सिलेंडरची एकूण किंमत ७५ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. कारवाई दरम्यान प्रकाश सोमनदास मंगतानी (वय ६०), पराग सुरेश तिडके (वय ४४) व संजय शंकर घोसे (वय ४१, तिघेही रा. यवतमाळ) यांच्याकडे चौकशी केली, असता त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. तसेच कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत. त्यामुळे अवैधरित्या साठा केल्याचा संशय बळावल्याने सिलेंडर जप्त करून पुढील कारवाईसाठी पोलिस ठाण्यात आणण्यात आले. तहसील कार्यालयाकडून प्राप्त लेखी अहवालाच्या आधारे तिघांविरुद्ध गुन्हा क्रमांक ३०३/२०२६ अन्वये अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या कलम ३ व ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने, प्रभारी पोलीस निरीक्षक नंदकिशोर काळे व तहसीलदार योगेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. गुन्हे प्रगटीकरण पथकाचे प्रमुख पो. उपनिरीक्षक गणेश सपकाळ, पो. उपनिरीक्षक दीपक घोगरे, पोलीस हवालदार रावसाहेब शेंडे, पोलीस हवालदार किरण पडघण, पोलीस शिपाई गौरव ठाकरे, पवन नादेकर, पवन तडसे, प्रदीप कुरडकर, मयूर तेल्लेवार, प्रतिक नेवरे तसेच निरीक्षण अधिकारी निलेश भास्कर कळसकर, पुरवठा निरीक्षक सीमा दोंदल व महसूल सहाय्यक विष्णु डोळसे यांनी ही कारवाई यशस्वी केली. दरम्यान, नागरिकांनी अवैध गॅस सिलेंडर साठवणूक किंवा जादा दराने विक्री करू नये, तसे आढळल्यास तात्काळ माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# मध्यरात्री नगरसेविकेची धाव; दत्तनगरातील पाणीटंचाईवर तोडगा

प्रतिनिधी २४ एप्रिल



**दिग्रस :** शहरातील प्रभाग क्रमांक ४ मधील दत्तनगर परिसरात बंद पडलेल्या हापशीमुळे नागरिकांना, विशेषतः महिलांना, पाणीटंचाईचा तीव्र सामना करावा लागत होता. दीड किलोमीटर अंतरावरील खाजा बाबा दर्गा परिसरातून पाणी आणण्याची वेळ येत असल्याने स्थानिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती.

या पार्श्वभूमीवर परिसरातील महिलांनी नगरसेविका स्वाती धावडे यांच्याकडे थेट धाव घेत समस्या मांडली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी तातडीने ठेकेदाराशी संपर्क साधत मध्यरात्रीच उपाययोजना सुरू केली. रात्री साडेअकरा ते पावणेबाराच्या सुमारास त्या स्वतः घटनास्थळी दाखल झाल्या आणि दुरुस्तीचे काम मार्गी लावले.

त्यांच्या सोबत पती दिनेश धावडे उपस्थित होते. काही तासांत हापशी दुरुस्त झाल्याने परिसरातील पाणीपुरवठा पूर्ववत सुरू झाला. मध्यरात्री एका लोकप्रतिनिधीने प्रत्यक्ष उपस्थित राहून समस्या सोडवल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

"आमच्या अडचणीसाठी एवढ्या रात्री त्यांनी स्वतः पुढाकार घेतला," अशी प्रतिक्रिया स्थानिक महिलांनी दिली. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली समस्या काही तासांत सुटल्याने दत्तनगर परिसरात दिलासा व्यक्त होत आहे.

# अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई; दोन ट्रक जप्त

प्रतिनिधी २४ एप्रिल



**झरी-जामणी :** केळापुर येथे नवनियुक्त उपविभागीय अधिकारी (SDO) म्हणून पदभार स्वीकारताच आयएएस अधिकारी रेवैया डोंगरे यांनी अवैध वाळू वाहतुकीविरोधात कडक भूमिका घेत धडक कारवाई केली. २० एप्रिल रोजी पहाटे सुमारे ३ वाजता झरी-जामणी तहसीलमधील अहेरल्ली परिसरात ही कारवाई करण्यात आली.

मुकुटबन ते पांढरकवडा मार्गावरून संशयास्पदरीत्या जाणाऱ्या दोन १६-चाकी ट्रकांना अडवून तपासणी करण्यात आली. या तपासणीत अंदाजे २० ब्रास अवैध वाळू आढळून आली असून ती जप्त करण्यात आली आहे.

संबंधित ट्रकांची ओळख एमएच-२९ बीई-८३०० (चालक यासीन अली, रा. यवतमाळ) आणि एमएच-२९ बीडी-२४०२ (चालक कासिब खान, रा. नेर) अशी पटली आहे.

कारवाईनंतर तहसीलदार अक्षय रासने यांच्या सूचनेनुसार महसूल व पोलीस विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. यामध्ये पाटण पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, उपतहसीलदार नरेंद्र थोटे तसेच इतर अधिकारी सहभागी झाले.

नवनियुक्त उपविभागीय अधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारताच केलेल्या या थेट कारवाईमुळे परिसरातील अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या घटकांमध्ये खळबळ उडाली आहे. प्रशासनाने यापुढेही अशा कारवाया सातत्याने सुरू राहतील, असा स्पष्ट इशारा दिला आहे.

# वणीत घरफोडी

प्रतिनिधी २४ एप्रिल

**वणी :** शहरातील गणेशपूर परिसरातील मंगलमुर्ती पार्क येथे बंद घर फोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे २ लाख ३० हजार रुपयांच्या सोन्याच्या दागिन्यांवर हात साफ केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी वणी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. रामरतन सिताराम हरडे (वय ५९, रा. मंगलमुर्ती पार्क, प्लॉट क्र. ४२, गणेशपूर, वणी) हे २१ एप्रिल रोजी सायंकाळी घराला कुलूप लावून ड्युटीवर गेले होते. दरम्यान, २२ एप्रिल दुपारपर्यंतच्या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील दोन सोन्याच्या बांगड्या (४० ग्रॅम), एक सोन्याचा गोफ (२० ग्रॅम), दोन अंगठ्या (१० ग्रॅम) तसेच कानातील लटकन (६ ग्रॅम) असा एकूण ७६ ग्रॅम वजनाचे, सुमारे २ लाख ३० हजार रुपये किमतीचे दागिने चोरी करून नेले. याबाबत २३ एप्रिल रोजी पहाटे फिर्याद दाखल करण्यात आली असून, भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (३), ३३१ (४) व ३०५ (अ) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक साजिद सय्यद करीत आहेत.

# भारत पेट्रोलियम पंपाची लीज पाच वर्षांनी वाढवली

## दीर्घकाळ प्रलंबित वादानंतर जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय

प्रतिनिधी २४ एप्रिल

**उमरखेड :** शहरातील नगरपरिषद परिसरातील भारत पेट्रोलियमच्या पेट्रोल पंपाबाबत दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या लीज वादाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी संबंधित जागेची लीज 'पुरुषोत्तम अँड कंपनी' या डीलरच्या नावे पुढील पाच वर्षांसाठी वाढविण्याचा आदेश जारी केला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातून पारित आदेशानुसार, संबंधित जागा ही भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडला देण्यात आलेली असून, मूळ लीज मुदत संपल्यानंतर प्रकरण विविध न्यायालयीन व प्रशासकीय स्तरांवर प्रलंबित होते. या काळात उच्च न्यायालय, महसूल विभाग तसेच स्थानिक प्रशासनाकडून स्थगिती आदेश, सुनावण्या आणि तपासण्या होत राहिल्याने अंतिम निर्णय लांबणीवर पडला होता.

या प्रकरणात जमीन मालकी हक्क, भाडेपट्टा अटी, महसूल कायद्यांचे पालन तसेच सार्वजनिक हित या मुद्द्यांवरून वाद निर्माण झाला होता. विशेषतः महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अंतर्गत अधिकारांचा वापर आणि पेट्रोलियमसंबंधी नियमांनुसार लीज नूतनीकरणाची प्रक्रिया यावर अनेकदा आक्षेप घेण्यात आले होते. काही निर्णयांविरोधात उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल झाल्याने प्रकरण अधिक गुंतागुंतीचे बनले होते.

दरम्यान, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नगर परिषद तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अहवालांच्या आधारे जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर पडताळणी केली. या अहवालांमध्ये संबंधित पेट्रोल पंपाचे शहरातील मध्यवर्ती स्थान, नागरिकांसाठी असलेली आवश्यकता, वाहतुकीची सोय तसेच पर्यायी जागेचा अभाव यांचा विचार करण्यात आला. तसेच संबंधित डीलरने आवश्यक कागदपत्रे, शुल्क आणि नियमांची पूर्तता केल्याचे नमूद करण्यात आले आहे.

याआधारे 'पुरुषोत्तम अँड कंपनी' यांना सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी लीज नूतनीकरणास मंजुरी देण्यात आली आहे. या कालावधीत सर्व अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहणार असून, कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास प्रशासनाला कारवाई करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे. या निर्णयामुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या वादाला दिलासा मिळाला असून, शहरातील इंधन पुरवठा अखंडित ठेवण्याच्या दृष्टीनेही हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

# नाल्याचे खोलीकरण व रस्ता रुंदीकरण कधी होणार ?

## नगरसेवक राजू दुधे यांनी अध्यक्षांना दिले पत्र

प्रतिनिधी २४ एप्रिल



**पुसद :** नगरपरिषद हद्दीत येत असलेल्या प्रभाग क्रमांक १ मधून निंबी कवडीपूर येथून उगम असलेल्या विश्रामगृहाच्या पाठीमागून पूस नदीला मिळणाऱ्या नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यासाठी प्रभाग क्रमांक १ व परिसरातील नागरिकांनी २ फेब्रुवारी रोजी नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांना निवेदन दिले होते. त्यानंतर, माजी पाणीपुरवठा सभापती आणि नगरसेवक राजू दुधे यांनी ६ मार्च रोजी नगराध्यक्षा मोहिनीताई नाईक यांना पत्र दिले होते, ज्यामध्ये या नाल्याचे खोलीकरण आणि रुंदीकरण कार्य लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली होती.

तथापि, पत्र देऊन एक ते दीड महिने होऊन गेले तरीही नगरपरिषद प्रशासनाकडून कुठलीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. या कार्यासाठी अनेक नागरिकांनी, जसे की माधव अण्णा पलीकोंडावार, अशोक बाबर, सुभाष चौधरी, कैलास तुते, वसंतराव धोत्रे, राजेश चव्हाण, बाळासाहेब चव्हाण आणि विजय काळे यांनी मुख्याधिकारी यांना निवेदन दिले आहे.

गेल्या चार वर्षांच्या प्रशासक राजकाळामध्ये या समस्यांवर अद्याप कोणतेही ठोस उत्तर मिळालेले नाही. उदाहरणार्थ, पूस नदीपासून वॉटर सप्लाय कडून भोजला रोड कडे जाणारा रस्ता रुंदीकरणाची आवश्यकता आहे. या रस्त्याची रुंदी सुमारे २४ मीटर असून हा रस्ता फक्त १ किलोमीटर लांब आहे. जर हा रस्ता रुंद केला गेला, तर शिवाजी चौकात होणारी वाहतुकीची गर्दी ७५% पर्यंत कमी होईल, तसेच अपघातांची संख्या देखील कमी होईल. नागरिकांची अपेक्षा आहे की, नगरपरिषद आणि सत्ताधाऱ्यांनी त्वरित या महत्वाच्या नागरी सुविधांचा विचार करून त्यावर कार्यवाही करावी.

# अतिवृष्टीग्रस्तांना तातडीने पीकविमा द्या; मुख्यमंत्र्यांकडे लोकप्रतिनिधींचे निवेदन

प्रतिनिधी २४ एप्रिल



**उमरखेड :** यवतमाळ जिल्ह्यात अलीकडील अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, बाधितांना पीकविमा योजनेंतर्गत तातडीने मदत देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे. या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले.

शासनाकडून नुकतीच जाहीर करण्यात आलेल्या पीकविमा नुकसान भरपाई यादीत यवतमाळ जिल्ह्याचा समावेश नसल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यामुळे आधीच अतिवृष्टीमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. ही बाब गंभीर असून, जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

निवेदनात यवतमाळ जिल्ह्याचा तात्काळ पीकविमा भरपाई यादीत समावेश करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच पंचनामे पूर्ण करून प्रत्यक्ष नुकसानाचे योग्य मूल्यांकन करण्याचीही गरज अधोरेखित करण्यात आली.

यावेळी उमरखेड-महागाव मतदारसंघाचे आमदार किसनराव वानखेडे, माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर, विजयराव खडसे, तसेच महेश काळेश्वरकर आणि डॉ. इरफान कुंदन उपस्थित होते.

दरम्यान, अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचे आर्थिक गणित विस्कळीत झाले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने निर्णय घेऊन मदत जाहीर करावी, अन्यथा शेतकरी आंदोलनाचा मार्ग स्वीकारू शकतात, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

# घाटंजीत अवैध सावकाराच्या घरी धाड

## झडतीत सात महत्वाचे कागदपत्र जप्त, घाटंजी पोलीस ठाण्यात तक्रार

प्रतिनिधी २४ एप्रिल



**घाटंजी :** तालुक्यातील वसंतनगर परिसरात अवैध सावकारीच्या तक्रारीवरून सहकार विभागाच्या पथकाने गुरुवारी दि. २३ एप्रिल रोजी धाड टाकली. या कारवाईत सात संशयास्पद कागदपत्रे जप्त करण्यात आली असून, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत पुढील कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांच्या आदेशान्वये ही कारवाई करण्यात आली. प्रकाश अनंतराव खंदार व इतर दोघांच्या राहत्या घरावर सावकारी पथकाने झडती घेतली. या वेळी सौदेपत्र, खरेदीखत तसेच इतर आर्थिक व्यवहारांशी संबंधित कागदपत्रे आढळून आली. एकूण सात कागदपत्रे जप्त करण्यात आली असून त्यांची सखोल पडताळणी करण्यात येणार आहे.

प्राथमिक पाहणीत ही कागदपत्रे अवैध सावकारी व्यवहारांशी संबंधित असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणाची सुरुवात २७ मार्च २०२६ रोजी करण्यात आलेल्या तक्रारीतून झाली. प्रतिभा सोनटक्के व उज्ज्वल सोनटक्के यांनी संबंधित व्यक्तींविरुद्ध अवैध सावकारी चालवित असल्याचा आरोप करत लेखी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पथकाने प्रत्यक्ष स्थळी जाऊन तपास केला असता संबंधित कागदपत्रे हाती लागली. या कारवाईत सहकार विभागाचे अधिकारी, महसूल विभागाचे कर्मचारी तसेच पोलीस प्रशासनातील अधिकारी यांनी संयुक्तरीत्या सहभाग घेतला. सहाय्यक निबंधक ए. के. नाईक यांच्या नेतृत्वाखाली पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने झडती पार पाडली. त्यांना घाटंजी व राळेगाव येथील सहकार विभागातील अधिकारी, तसेच पोलीस कर्मचाऱ्यांची मदत मिळाली. ही संपूर्ण कारवाई जिल्हाधिकारी विकास मोना आणि पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, जप्त करण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी पूर्ण झाल्यानंतर संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ मधील तरतुदीनुसार गुन्हा दाखल करण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. परिसरात या कारवाईमुळे खळबळ उडाली आहे.

# दिग्रस येथे ओबीसी संघटनांचा एल्गार

## जातनिहाय जनगणना, शिष्यवृत्ती व शेतकरी प्रश्नांवर ठोस निर्णयाची मागणी

प्रतिनिधी २४ एप्रिल



**दिग्रस :** विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ओबीसी संघटना दिग्रसच्या वतीने गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६ रोजी तहसील कार्यालयावर निवेदन सादर करण्यात आले. सकाळी ११.३० वाजता तहसीलदारांमार्फत राष्ट्रपती, राज्यपाल, मुख्यमंत्री, ओबीसी आयोग तसेच जिल्हाधिकारी यांना हे निवेदन पाठविण्यात आले.

या वेळी ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात ओबीसी, एससी, एसटी समाजावर होत असलेल्या अन्यायाविरोधात ठोस भूमिका मांडण्यात आली असून, अनेक महत्त्वाच्या मागण्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये जातनिहाय जनगणना स्वतंत्रपणे करण्यात यावी, कडक यूजीसी इक्विटी रेग्युलेशन लागू करावे, शेतकऱ्यांना शेतमालासाठी हमीभाव (एमएसपी) मिळावा, शिक्षकांना टीईटी परीक्षेतून सूट द्यावी तसेच विद्यार्थ्यांची थांबलेली शिष्यवृत्ती तत्काळ सुरू करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

संघटनेने केंद्र सरकारच्या भूमिकेचा उल्लेख करताना जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व व विकासासाठी स्वतंत्र जातनिहाय जनगणना अत्यावश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

याशिवाय शेतीला उद्योगाचा दर्जा देऊन शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याची मागणीही करण्यात आली. वाढत्या शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर शाश्वत धोरणांची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.सर्व मागण्या तातडीने मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

या निवेदनावेळी सागर महिंद्रे, विजय घाटे, गजानन आंबेकर, पुंडलिक उबाळे, संदीप रत्नपारखी, दिलीप जवादे, मनोहर काटकर, आनंद राऊत, भारत पाटील महिंद्रे, एकनाथ चिंचाने, ओंकार ठाकरे, कैलास नवघरे, मोरेश्वर उईके, दिलीप शिंगाने, डॉ. गणेश महाजन, अविनाश लखपती, सुरेश आरेकर, दीपक माहुरकर, अ‍ॅड. नरेश इंगोले, लक्ष्मण वासकर, साहेबराव हटवार, डॉ. सदानंद निरपासे, विकास गावंडे, विनोद वानखेडे, दुर्गेश निभवे, टिळक नाईक, दिलीप डहाके, सुनील हिरास आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शुक्रवार दि २४ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## भटउमरा येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम उत्साहात...

**वाशिम :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा विधिज्ञ मंडळ व सामाजिक वनिकरण विभाग, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने २२ एप्रिल २०२६ रोजी 'जागतिक वसुंधरा दिनानिमित्त' स्व. काशीरामजी चौधरी विद्यालय, भटउमरा येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या राज्यगीताने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. जी. चौखंडे उपस्थित होते. त्यांनी यावेळी उपस्थितांना NALSA (Child-Friendly Legal Services for Children) एम्पस, २०२४ विषयी मार्गदर्शन केले तसेच जागतिक वसुंधरा दिनाचे महत्त्व विषद केले.वकिल संघाचे सचिव ॲड. डी. डी. गुडदे यांनी बालमजुरी, बालभीक मागणे व बाल तस्करी या गंभीर विषयांवर उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. मुख्य न्यायरक्षक ॲड. परमेश्वर शेळके यांनी इध्ण्एर्धं संदर्भात मार्गदर्शन करताना बालकांच्या संरक्षणासाठी कायद्याचे महत्त्व अधोरेखित केले.या कार्यक्रमास वनपरिक्षेत्र अधिकारी कातखेडे, काशीरामजी चौधरी विद्यालयाचे संस्थापक सचिव सुभाषराव चौधरी, मुख्याध्यापक आर. ए. चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

## राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ वरील वृक्षतोडी विरोधात...

# उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल !

## सामाजिक कार्यकर्ते सागर कोकास यांचा १०९ वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी पुढाकार

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ वर सेवा रस्ता बांधकामाच्या नावाखाली शंभर वर्षांहून अधिक जुन्या वृक्षांची मोठ्या प्रमाणावर होणारी तोड थांबवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सागर शंकर कोकास यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये जनहित याचिका दाखल केली आहे. सदर याचिका ॲड.डॉ मोहन एस. गवई यांनी याचिकाकर्त्यांचे वकील म्हणून दाखल केली आहे.

सामाजिक कार्यकर्ते सागर कोकास यांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये दाखल केलेल्या जनहित याचिकेत वाशीम शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर १०० वर्षांहून अधिक जुनी झाडे तोडण्याचा निर्णय घेतला गेला. या झाडांना वाचविण्यासाठी व त्यांचे संवर्धन करण्यासाठी शहरातील पर्यावरणप्रेमी नागरिकांनी व सामाजिक संस्थांनी वारंवार हरकती घेतल्या . त्या हरकती विचारात घेतल्या गेल्या नाहीत. या मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या १०९ झाडांचे वैज्ञानिक पद्धतीने पुनर्लागवड करण्याचा पर्याय उपलब्ध असतानाही प्रशासनाकडून तो पर्याय दुर्लक्षित करण्यात आला.

तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी कायदेशीर प्रक्रिया व नैसर्गिक न्यायाचे तत्त्व पाळले नाही, असा आरोप या जनहित याचिकेत करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ते सागर कोकास यांनी या जनहित याचिकेत 'त्या' १०९ झाडांच्या वृक्षतोडीला दिलेली परवानगी तात्काळ रद्द करण्यात यावी, सर्व वृक्षतोडीवर स्थगिती देण्यात यावी, ☐ पर्यावरण व नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने योग्य उपाययोजना करण्यात याव्यात अशी न्यायोचित मागणी केली आहे. या जनहित याचिकेमध्ये नमूद केल्याप्रमाणे, स्वच्छ पर्यावरण व शुद्ध हवा हा भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत मूलभूत हक्क आहे आणि वृक्षतोड हा त्या हक्काचा भंग आहे. असा संवैधानिक मुद्दा सुद्धा मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला आहे.



'विकासाच्या नावाखाली शहराची हरित संपत्ती नष्ट करणे योग्य नाही. झाडे वाचवूनही विकास शक्य आहे. प्रशासनाने जनतेच्या भावना आणि पर्यावरणाचा विचार करावा.' ही याचिका वाशीम शहरातील पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वाची असून, नागरिकांच्या आरोग्य व भविष्यासाठी निर्णायक ठरणार आहे.

**सागर कोकास,** सामाजिक कार्यकर्ते, वाशीम




## थोडक्यात

### रिसोड न.प.च्या जनगणना -२०२७ प्रशिक्षण सत्राला प्रारंभ



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

जनगणना-२०२७ च्या पार्श्वभूमीवर नगर परिषद यंत्रणा सज्ज झाली असून प्रगणक व पर्यवेक्षक यांच्या तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिराला दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी नगर परिषद सभागृहामध्ये प्रारंभ झाला आहे.

जनगणना-२०२७ हि पूर्णपणे डीजीटल पद्धतीने होणार असून माहितीची गोपनीयता आणि सुरक्षितता यावर भर देण्यात येणार असल्याबाबत सांगितले. जनगणना २०२७ हि दोन चरनात होणार असून पहिल्या चरणात घरयादी गणना होणार असून दुसऱ्या चरणात व्यक्ती गणना होणार असल्याबाबत नमूद केले. प्रथम चरण हे दिनांक १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधी मध्ये होणार असून त्याआधी दिनांक ०१ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीमध्ये सर्व नागरिकांना स्वःगणना नोंदविता येणार असलेबाबत सांगितले.जिल्हास्तरावर प्रशिक्षण घेतलेले तज्ञ प्रशिक्षक यांचेमार्फत सर्व प्रगणक आणि पर्यवेक्षक यांना तीन दिवसात सखोल प्रशिक्षण देण्यात येणार असल्याने सर्व प्रगणक आणि पर्यवेक्षक यांनी गांभीर्यपूर्वक प्रशिक्षण घ्यावे असे सूचित केले.यावेळी नगर परिषदेचे प्रशासकीय अधिकारी तथा अतिरिक्त चार्ज जनगणना अधिकारी श्री.शिवनंदन बरडे, क्षेत्रीय प्रशिक्षक श्री.दिपक बाजड व श्री.आनंद भावसार, सहायक प्रकल्प अधिकारी श्री. राजेंद्र पट्टेबहादूर, जणगणना लिपिक श्री.रितेश इरतकर, तांत्रिक सहायक श्री.उमेश ढोमणे व नगर परिषद कमर्चारी उपस्थित होते.

# अनसिंग येथील जीवन प्राधिकरणच्या पाणीपुरवठा योजनेत भ्रष्टाचार

## यश चव्हाण यांचा २७ एप्रिलपासून उपोषणाचा इशारा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

तालुक्यातील अनसिंग येथील महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभागाच्या वतीने सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेतील भ्रष्टाचार, निकृष्ट व अपूर्ण काम संबंधित प्रशासनाच्या निष्क्रियतेच्या विरोधात सामाजिक कार्यकर्ते यश चव्हाण यांनी सोमवार २७ एप्रिलपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांना २२ एप्रिल रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

यश चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनात , महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभागाच्या वतीने जल जीवन मिशन अंतर्गत राबविण्यात येणारी पाणीपुरवठा योजना ही गावातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या कायमस्वरूपी प्रश्नाचे निराकरण करण्यासाठी महत्त्वाची योजना आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ व सुरक्षित पाणी पोहोचवणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असताना, प्रत्यक्षात अनसिंग येथे ही योजना संपूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप करून यामध्ये कोट्यवधी रुपयांचा उघड भ्रष्टाचार झाला असल्याची बाब नमूद केली आहे. ही वस्तुस्थिती आज सर्वांसमोर स्पष्टपणे दिसून येत आहे.सदर योजना सन २०२२ मध्ये सुरू करण्यात आली असून ती सन २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र आज पर्यंत ही योजना पूर्ण झालेली नाही. उलट अनेक ठिकाणी काम अपूर्ण अवस्थेत पडून आहे. योजनेसाठी तब्बल रुपये ८७३.७४ लक्ष इतका प्रचंड शासकीय निधी संबंधित



कंत्राटदारास देण्यात आलेला असूनही प्रत्यक्षात कामाची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट दर्जाची दिसत आहे.तसेच मोठ्या प्रमाणावर अपूर्णता आढळून येत आहे. त्यामुळे हा संपूर्ण निधी कुठे व कसा खर्च झाला याबाबत शंका उपस्थित होत असून प्रत्यक्ष भ्रष्टाचार झाल्याचा आरोपही यश चव्हाण यांनी केला आहे.

यासंदर्भात अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासने दिली, काम पूर्ण करण्यासाठी ठराविक तारखासुद्धा दिल्यात, परंतु त्या सर्व आश्वासनांची जाणीवपूर्वक पायमल्ली करण्यात आली. १० जानेवारी २०२५ रोजी दिलेल्या लेखी आश्वासनानुसार ३१ मार्च २०२५ पर्यंत काम पूर्ण करण्याचे सांगण्यात आले होते. त्यानंतर २६ डिसेंबर २०२५ रोजी पुन्हा लेखी आश्वासन देऊन ७ फेब्रुवारी २०२६ पासून पाणीपुरवठा सुरू करण्याचे नमूद करण्यात आले. परंतु आजपर्यंत कोणतीही अंमलबजावणी झालेली नाही. सबंधित कंत्राटदाराने पाईपलाईन टाकताना कोणत्याही तांत्रिक नियमांचे पालन केलेले नाही. अनेक ठिकाणी पाईपलाईनमध्ये लिकेज असून पाण्याची मोठ्या प्रमाणावर नासाडी होत आहे. काही ठिकाणी काम अपूर्ण असून काही ठिकाणी कागदोपत्री काम दाखवून प्रत्यक्षात कामच केलेले नाही. गावातील अनेक रस्ते खोदून ठेवण्यात आले असून त्यांची दुरुस्तीसुद्धा करण्यात आलेली नाही, ज्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.याशिवाय जुन्या पाणीपुरवठा लाईनचे नुकसान करण्यात आले असून त्यामुळे गावातील विद्यमान पाणीपुरवठा व्यवस्थाही कोलमडलेली आहे. परिणामी नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. या सर्व गंभीर बाबींचा सखोल विचार करता, ही योजना केवळ अपयशी ठरलेली नसून पूर्णपणे भ्रष्टाचाराचे जिवंत उदाहरण बनलेली असल्याचा आरोपही यश चव्हाण यांनी केला आहे. अनसिंग येथील पाणीपुरवठा योजनेची तात्काळ उच्चस्तरीय तांत्रिक व आर्थिक चौकशी करण्यात यावी. संबंधित कंत्राटदार एस. बी. माहोरे यांना तात्काळ ब्लॅकलिस्ट करण्यात यावे.

संबंधित अधिकारी व अभियंते यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी.अनसिंग गावात तात्काळ व नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी निश्चित कालमर्यादा जाहीर करण्याच्या मागणीसाठी अनसिंग येथील सर्व नागरिकांच्या वतीने प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि न्याय मिळण्यासाठी सोमवार २७ एप्रिल २०२६ पासून वाशीम येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार असल्याचे यश चव्हाण यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

## ज्यांनी पैसे दिले, त्यांचे अनुदान जमा केले...

# घरकुल योजनेत हेराफेरी, मालामाल झाले अधिकारी !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध घरकुलसबंधित योजना भ्रष्टाचाराचे कुरण बनल्या आहेत. प्रधानमंत्री आवास, रमाई आवास, शबरी आवास आदी योजनेअंतर्गत घरकुल मंजूर करतांना मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला असल्याचे वास्तव समोर येत आहे. ज्या लाभार्थ्यांनी पैसे दिले त्यांचेच अनुदान हप्ते जमा करण्यात आले अशी विश्वसनीय माहिती हाती आली आहे. परिणामी या योजनेत स्थानिक पातळीवरील काही सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवक व नेहमीचेच सराईत दलाल मालामाल झाले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

प्राप्त माहितीनुसार जिल्ह्यातील रिसोड आणि मालेगांव तालुक्यात घरकुलांच्या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात हेराफेरी झाली असून पात्र लाभार्थ्यांना डावलून बोगस लाभार्थ्यांच्या नावाखाली शासकीय निधी हडपण्यात आला असल्याची माहिती सिटीन्यूज सुपरफास्टकडे आली आहे. यात रिसोड तालुका अव्वल स्थानावर असल्याचे बोलले जात आहे. ही बाब तालुक्यातील अनेक मातब्बर नेत्यांसाठी लज्जास्पद आहे. तर कर्तव्यदक्ष म्हणून नावलौकिक असलेल्या गटविकास अधिकाऱ्यांच्या लौकिकास कलंकित करणारी आहे. पात्र यादीत नाव समाविष्ट करण्यापासून ते थेट हप्ते बँक खात्यात जमा करण्यापर्यंत गोरगरिबांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. परिणामी ज्या गरीब लाभार्थ्यांना लाच देणे शक्य नाही अशा लाभार्थ्यांना डावलून अपात्र, बोगस लाभार्थ्यांच्या नावाखाली घरकुल अनुदानाची खैरात करण्यात येत आहे. याचे अनेक पुरावे समोर येत आहेत. यात ज्यांच्याकडे दहा एकरापासून पन्नास एकरापर्यंत जमीन जुमला आहे. ज्यांची टोलेजंग घर बांधलेली आहेत अशा लोकांना सुद्धा घरकुल पात्र यादीत समाविष्ट करून अनुदान देण्यात आले आहे. तर काही ठिकाणी चक्क मयत असलेल्या व्यक्तींच्या नावावर देखील घरकुल अनुदान देण्यात आले असल्याची खळबळजनक माहिती सूत्रांनी दिली आहे. विशेष बाब म्हणजे जे गावात राहत नाहीत अशा लोकांच्या नावावर घरकुल मंजूर करून पहिला व दुसरा हप्ता देण्यात आला असून प्रत्यक्षात मात्र एक वीटही रचलेली नाही. ही बाब संनियंत्रण करणाऱ्या यंत्रणेच्या पारदर्शकतेवर प्रश्चिन्ह निर्माण करणारी आहे. या घोटाळ्यात आणि लाचखोरीत काही अधिकाऱ्यांचे विश्वासू दलाल महत्त्वाची भूमिका बजावत असून स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधीपासून ते गृह निर्माण अभियंता, विस्तार अधिकारी व त्यांचे वरिष्ठ अधिकारी मोठ्या प्रमाणात माया गोळा करत आहेत. यामुळे शासनाच्या स्तुत्य हेतुला सुरुंग लावून गोरगरिबांच्या हक्कावर गदा आणली जात आहे. या गंभीर प्रकाराची तज्ञ पथकांकडून सखोल व पारदर्शक चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई व्हावी तरच शासनाचा मुख्य हेतू सफल होईल असे सुजाण नागरिक बोलत आहेत. या बाबत अनेक तक्रारी देखील प्रशासनाकडे आल्या आहेत. परंतु 'आम्ही सर्व मावसभाऊ, मिळून मिसळून खाऊ..!' हे तत्व जोपासत वरिष्ठांकडून अशा तक्रारींना केराची टोपली दाखवण्यात येत आहे. त्यामुळे 'हम करें सो कायदा' या तोऱ्यात काही अधिकारी, पदाधिकारी आणि क्षेत्रीय कर्मचारी वावरत आहेत. ही बाब वरिष्ठ प्रशासनासाठी अशोभनीय आहे.

### अकुशल काम, रोजगार सेवकच हडपतो दाम...


प्रधानमंत्री आवास योजनेत व ईतर काही घरकुल योजनेत अकुशल कामासाठी मजूर लावून काम करण्याची अट आहे. यासाठी जॉबकार्ड असलेल्या मजुरांना काम मिळावे हा स्तुत्य हेतू समोर ठेवण्यात आला आहे. त्यासाठी ठराविक अतिरिक्त निधी देण्यात येतो. मात्र इथेही मोठी हेराफेरी होत आहे. रिसोड तालुक्यात काही गावातील रोजगार सेवकांनी आपल्या मर्जीतील जॉबकार्ड धारक मजुरांचे मस्टर तयार करून शासकीय निधी स्वतःच हडप केला असल्याची तक्रार दाखल झाली आहे. मात्र या तक्रारींकडे संबंधित प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे गरकुलसबंधी ज्या काही योजना केंद्र व राज्य सरकारने सुरू केल्या आहेत. त्या सर्व योजना केवळ भ्रष्टाचाराच्या कुरण बनल्या आहेत. हेच रिसोड तालुक्यातील महाघोटाळ्यावरून पुन्हा एकदा स्पष्ट होत आहे.



## रिसोड शहरातील सिव्हिल लाईनवर

# उजेडाची नवी पहाट!

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●





रिसोड शहराच्या मध्यवर्ती आणि अत्यंत वर्दळीच्या सिव्हिल लाईन मुख्य रस्त्यावर अखेर प्रकाशाची नवी पहाट उगवली आहे.अनेक वर्षां पासुन प्रलंबित असलेल्या स्ट्रीट लाईट समस्येवर आता कायमस्वरूपी तोडगा निघाल्याने नागरिकां मध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.नागरिक आणि व्यापाऱ्यांच्या सातत्यपुर्ण पाठपुराव्याला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देत हा महत्त्वपुर्ण प्रश्न मार्गी लावला आहे.

शहरातील सिव्हिल लाईन हा रिसोड शहराचा मुख्य व अत्यंत गजबजलेला मार्ग आहे.या रस्त्यावर दररोज शेकडो वाहनांची रहदारी होत असते,तसेच मोठ्या प्रमाणात व्यापारी व्यवहारही चालतात.मात्र रात्रीच्या वेळी या रस्त्यावर पुरेशा प्रकाशाचा अभाव असल्यामुळे अपघातांची भीती कायम होती.अंधारामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला होता,तर व्यापाऱ्यांना ही व्यवसायात अडथळे निर्माण होत होते.या पार्श्वभुमीवर नागरिक आणि व्यापारी वर्गाने रिसोड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सतीश शेवदा यांच्याकडे वारंवार निवेदन देत समस्या मांडली. स्थानिक पातळीवरच नव्हे,तर सामाजिक माध्यमांद्वारेही या मागणीला जोर मिळत गेला. नागरिकांच्या या सातत्यपुर्ण प्रयत्नांची दखल घेत मुख्याधिकारी शेवदा यांनी या प्रश्नाला प्राधान्य देत प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा सुरू केला.

या कामासाठी आवश्यक निधी मिळविण्या साठी त्यांनी वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच माजी खासदार अनंतराव देशमुख आणि जिल्हाधिकारी यांच्याशी सातत्याने संपर्क साधला.एप्रिल आणि मे २०२५ दरम्यान प्रस्ताव सादर करण्यात आला आणि त्याला लवकरच मंजुरीही मिळाली.त्या नंतर विविध प्रशासकीय प्रक्रिया पुर्ण करत ऑक्टोबर २०२५ मध्ये या प्रकल्पाला अंतिम स्वरूप देण्यात आले आणि प्रत्यक्षात स्ट्रीट लाईट सुरू करण्यात आले.आज सिव्हिल लाईन रस्ता प्रकाशमय झाला असुन संपुर्ण परिसरात उजेडाची लखलख दिसुन येत आहे.रात्रीच्या वेळी प्रवास अधिक सुरक्षित झाला आहे,तर व्यापाऱ्यांच्या व्यवसायालाही चालना मिळत आहे.या निर्णयामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असुन प्रशासनाबद्दल कृतज्ञतेची भावना व्यक्त केली जात आहे.स्थानिक व्यापाऱ्यांनी सांगितले की, 'यापूर्वी अंधारामुळे ग्राहक रात्री कमी येत होते, मात्र आता प्रकाशामुळे वातावरण सुरक्षित व आकर्षक झाले आहे.'तर नागरिकांनीही हा निर्णय शहराच्या विकासासाठी महत्त्वाचा टप्पा असल्याचे म्हटले आहे.

**प्रशासनाची भूमिका ठळक**

मुख्याधिकारी सतीश शेवदा यांनी या कामासाठी घेतलेली पुढाकाराची भूमिका विशेष ठरली. त्यांनी केवळ समस्या ऐकून न घेता तिचे निराकरण करण्यासाठी उच्चस्तरीय पातळीवर पाठपुरावा केला, ही बाब प्रशंसनीय मानली जात आहे. त्यांच्या या कार्यशैलीमुळे शहरातील इतर विकासकामांबाबतही नागरिकांमध्ये सकारात्मक अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अकोल्यात शिवसेनेची धार बोथट

प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोला :** एकेकाळी आपल्या आक्रमक शैलीसाठी ओळखल्या जाणाऱ्या शिवसेनेची अकोल्यातील अवस्था सध्या 'बॅनरपुरतीच' उरल्याचे चित्र दिसत आहे. शहरात ठिकठिकाणी लावलेले शिवसेनेचे बॅनर आणि त्यावरील मजकूर पाहून सामान्य अकोलेकर आता एकच प्रश्न विचारत आहेत - 'बॅनरवर वाघ, पण भूमिकेत मात्र शेळी का?'

### ♦ वाघाची डरकाळी की केवळ बॅनरबाजीचं ढोंग ?




### काय ती आक्रमकता, काय ते बॅनर!

न्यू तापडिया नगर उड्डाणपुलाचा खर्च ५० कोटींवरून थेट १०४ कोटींवर गेला, असा आरोप करणारे बॅनर शिवसेनेने शहरात लावले खरे, पण या भ्रष्टाचार करणाऱ्यांचे नाव घेताना मात्र शिवसैनिकांचे हात थरथरताना दिसत आहेत. १० वर्षांच्या छळाचा हिशोब मागण्याची भाषा करणाऱ्या शिवसेनेला नक्की भीती कोणाची वाटतेय ? सत्ताधारी भाजपची की वंचित बहुजन आघाडीची ? हा केवळ 'राजकीय गोंधळ' नसून जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्याचा प्रकार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

### १०४ कोटींचा फुगा, पण नाव घ्यायला फुटला घाम!

उड्डाणपुलाच्या नावाखाली ५० कोटींचा फुगा १०४ कोटींपर्यंत फुगला, तरीही शिवसेना केवळ 'मवाळ' भूमिका का घेत आहे ?. दूसरीकडे भाजपने थेट खा. अनुप धोत्रे व आ. रणधीर सावरकर यांनी निधी आणल्याचे बॅनर अकोला पुर्व भागात लावले आहे. पण, भाजप विरोधातील या नेत्यांचे नाव घेण्याचे धाडस मात्र उध्दव सेनेत नसल्याचे चित्र अकोल्यात आहे. यापैकी एकाचेही नाव घेण्याची हिंमत अकोल्यातील जिल्हाप्रमुखांपासून कार्यकर्त्यांपर्यंत कुणीही दाखवलेली नाही.

### विकासाच्या गप्पा की 'सेटिंग'चे राजकारण?

अकोल्यात शिवसेनेची अवस्था सध्या 'मिळमिळीत' झाली आहे. १० वर्षांचा हिशोब विचारताना थेट नाव घेण्याऐवजी सूचक विधाने करून शिवसेना नेमका कोणता 'सेफ गेम' खेळत आहे? ही शिवसेनेची आक्रमकता नक्की कुणाच्या दावणीला बांधली गेली आहे, असा सवाल आता उपस्थित होत आहे. सामान्यांचे प्रश्न मांडण्यापेक्षा केवळ वेळ मारून नेण्याचे हे ढोंग असल्याची टीका होत आहे.

# गॅस एजन्सी समोरील रांग कधी संपेल



प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोला :** गॅस टंचाईने सामान्य माणूस मेटाकुटीला आला आहे. उन्हातान्हात तासनतास रांगेत उभा आहे. त्याचे राजकीय पक्षांना सोयरसुतक नाही. अशा कठीण परिस्थितीत जिल्हा ग्राहक मंचचे पदाधिकारी तसेच सदस्य पोटतिडकीने कार्य करताना दिसतात. त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे घरपोच गॅस वितरणाला गती मिळत आहे.

गॅस बुकिंग मोबाईल वरून होत असले तरी पावती फाडण्यासाठी एजन्सी समोर लांबच लांब रांगा लागलेल्या दिसतात. तिथून सिलिंडर घेण्यासाठी गोडाऊन वर जावे लागते. जेष्ठ नागरिकांना होणारा हा

### ♦ ग्राहकांना पडला यक्षप्रश्न

त्रास ग्राहक मंचच्या लक्षात आला. त्यांनी एजन्सी कार्यालयांना भेटी देऊन ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासोबतच घरपोच गॅस वितरण करण्यात यावी अशी विनंती केली.

एजन्सी धारकांनी सुचनेची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले. सततच्या पाठपुराव्यामुळे घरपोच गॅस वितरणाला गती येत आहे. जिल्हा ग्राहक मंचचे विजय बाहकार, जिल्हा अध्यक्ष मंजित देशमुख या महत्वाच्या प्रश्नाकडे स्वतःहून लक्ष पुरवित आहेत. नागरिकांना दररोज होणारा त्रास दूर होणे आवश्यक आहे.

# अकोल्यात मालमत्ता करासोबत आता कचरा संकलन शुल्क अनिवार्य

प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोला :** महानगरपालिकेने शहराच्या स्वच्छतेबाबत एक मोठा निर्णय घेतला आहे. २१ एप्रिल २०२६ च्या पत्रकानुसार, आता आर्थिक वर्ष २०२६-२७ पासून मालमत्ता करासोबत कचरा संकलन शुल्कही समाविष्ट केले जाणार आहे. शहर पूर्णपणे कचरामुक्त करणे आणि स्वच्छता यंत्रणा अधिक बळकट करणे, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, नवीन व्यवस्था पूर्णपणे लागू होईपर्यंत सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटदाराकडेच कचरा संकलन शुल्क जमा करावे आणि त्याची अधिकृत पावती नक्की घ्यावी. शहराची स्वच्छता राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी आपल्या घरांतून आणि प्रतिष्ठानांतून निघणारा ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करावा आणि तो केवळ महानगरपालिकेच्या कचरा गाडीतच टाकावा. तसेच, नियमितपणे कचरा संकलन शुल्काचा भरणा करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# काला चबुतऱ्यासमोर भूमिगत कामात निष्काळजीपणा

प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोला :** शहरातील काला चबुतऱ्यासमोरील रस्त्यावर सुरू असलेल्या गटर योजनेच्या कामादरम्यान गंभीर प्रकार समोर आला आहे. काम करताना पाइपलाइन फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाणी रस्त्यावर वाहत असून, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याच्या अपव्ययाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

काला चबुतऱ्यासमोरील रस्त्यावर गटर योजनेचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र काम सुरू असतानाच येथील पाइपलाइन फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाणी बाहेर पडू लागले. सध्या हे पाणी थेट रस्त्यावर वाहत असून संपूर्ण परिसरात पाण्याचा अपव्यय होताना दिसत आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही बाब अत्यंत गंभीर मानली जात आहे. एका बाजूला अकोल्यातील काही

### ♦ फुटलेल्या पाइपलाइनमुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय



भागांमध्ये नागरिकांना पाण्याची टंचाई भासत आहे, तर दुसऱ्या बाजूला अशा प्रकारे हजारो लिटर पाणी वाया जात असल्याचे चित्र चिंताजनक आहे. या साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांना ये-जा करताना अडचणी निर्माण होत असून अपघाताचा धोका देखील वाढला आहे. भविष्यात अशीच परिस्थिती कायम राहिल्यास पाण्याची समस्या अधिक बिकट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. म्हणूनच संबंधित विभागाने तात्काळ दखल घेत पाइपलाइन दुरुस्ती करावी आणि गटर योजनेचे काम योग्य नियोजनासह पूर्ण करावे, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# अकोला रेल्वे स्थानकावर बेकायदेशीर वेंडरचा सुळसुळाट

**पोलिसांच्या पाठिंब्याचा संशय**

प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोला :** रेल्वेस्थानक परिसरात बेकायदेशीरपणे विक्रेते फिरत असतात. कोणतीही अधिकृत परवानगी नसताना हे वेंडर रेल्वेस्थानक परिसरात व्यवसाय करतात. आहेत. पोलिस प्रशासनाचा त्यांना अप्रत्यक्ष पाठिंबा असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अकोला रेल्वे स्थानक परिसरात अधिकृत विक्रेत्यांना व्यवसाय करता येतो. रितसर परवाना आवश्यक आहे. परंतु काही वेंडर बिनधास्तपणे फिरताना दिसतात. कोणतीही अधिकृत परवानगी नसतानाही ते स्थानक परिसरात सक्रिय आहेत. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, जेव्हा भुसावळ विभागातील रेल्वे कर्मचारी तपासणीसाठी येतात, तेव्हा ते



तत्काळ गायब होतात. त्यामुळे यामागे कोणाचा तरी पाठिंबा असल्याचा संशय अधिक बळावला आहे. या प्रकारामुळे रेल्वे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत असून, प्रवाशांच्या सुरक्षेलाही धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन बेकायदेशीर वेंडरांवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

# बसंती हॉस्पिटलचा 38 वा वर्धापन दिन उत्साहात ; सेवाभावी कार्याची यशस्वी परंपरा

प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोला :** अकोल्यातील श्रीमती बसंती चांडक रीलीफ़ फाउंडेशन

द्वारा संचालित बसंती हॉस्पिटलने आपल्या सेवाभावी कार्याचा ३८ वा वर्धापन दिन साजरा करत आरोग्यसेवेतील उल्लेखनीय योगदानाची परंपरा अधिक बळकट केली आहे. श्री लक्ष्मीनारायणजी चांडक यांच्या धर्मपत्नी बसंती चांडक यांच्या नावाने २४ एप्रिल १९८८ रोजी या ट्रस्टची स्थापना करण्यात आली होती. स्थापनेपासून आजपर्यंत अकोला नेत्र अस्पताल हॉस्पिटल मार्फत नेत्रशस्त्रक्रियांच्या क्षेत्रात मोठे कार्य करण्यात आले असून सुमारे ६९ हजारांहून अधिक डोळ्यांच्या ऑपरेशन यशस्वीरीत्या पार पडले आहेत. तसेच मागील ११ वर्षांपासून डायलिसिस सेवेतही महत्त्वपूर्ण योगदान देत सुमारे १ लाख ४० हजारांच्या जवळपास डायलिसिस प्रक्रिया महात्मा ज्योतिबा फुले एकत्रित प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत पूर्ण करण्यात आल्या आहेत. याशिवाय फिस्टुला आणि किडनी स्टोनसारख्या शस्त्रक्रियाही बसंती हॉस्पिटल मध्ये नियमितपणे करण्यात येत असून रुग्णांना दर्जेदार व परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे.




### सेवाभावी ट्रस्टचे कार्य उल्लेखनीय

◆ या संस्थेच्या कार्यामागे ट्रस्टी श्याम चांडक, रमाकांत खेतन, वंदना मेहता आणि हीरक मेहता यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हॉस्पिटलने आरोग्यसेवेच्या क्षेत्रात विश्वासार्ह ओळख निर्माण केली आहे. बसंती हॉस्पिटलचे व्यवस्थापक विजयकुमार मुंदडा यांनी ही माहिती देताना, भविष्यातही अधिकाधिक रुग्णांना सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला. एकूणच, गेल्या ३८ वर्षांपासून समाजातील गरजू रुग्णांना दिलासा देत बसंती हॉस्पिटलने आरोग्यसेवेतील आपली सामाजिक बांधिलकी यशस्वीपणे जपली असून, पुढील काळातही ही सेवा अखंडपणे सुरू राहणार असल्याचा विश्वास व्यक्त होत आहे.

# चिमुकल्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या भोंदू चेतनबाबा वर गुन्हा दाखल

**उपचाराच्या नावाखाली अघोरी जीवघेणे उपाय**

प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोला :** भोंदू चेतन बाबाचा चिमुकल्यांच्या जीवाशी खेळ प्रकरण अखेर लहान मुलांना दाताने उचलणाऱ्या भोंदू बाबावर गुन्हे दाखल. या प्रकारामुळे चांगलीच खळबळ उडाली होती. अखेर पोलिसांनी केली कारवाई.

चिमुकल्यांच्या जीवाशी खेळ खेळणाऱ्या भोंदू चेतन महाराजावर अखेर गुन्हा दाखल झाला आहे. अकोल्यातील मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसात महिला व बालकल्याण समितीकडून तक्रार दाखल झाली आहे. निंबा गावात अंधश्रद्धेचा अंगावर शहारे आणणारा प्रकार समोर आला होता. गावातील चेतन महाराज मुळे या भोंदू बाबाने लहान मुलांवर उपचाराच्या नावाखाली अक्षरशः लहान मुलांना दाताने उचलले, अन गरागरा फिरवले होते. याचे व्हिडीओ प्रचंड वायरल झाले. उपचाराच्या नावाखाली अक्षरशः भोंदू चेतन बाबाचा लहान मुलांच्या जीवाशी खेळ सुरु होत होता. या निंबा गावात ४ महाराजांचे



दरबार भरतात. लहान मुलांना दाताने उचलले, खिळ्यांच्या आसनावर बसणे यासोबतच अनेक अघोरी प्रकार हा भोंदू महाराज करत होते.

दरम्यान, या प्रकरणी अखेर कलम १२५ भारतीय न्यायसंहीता, कलम ७५ बालन्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ बालकांवरील क्रुरता तसेच कलम ३ महाराष्ट्र नरबळी आणी इतर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम कायदा २०१३ अंधश्रद्धा पसरविणे व अमानुष कृत्य अशा कलमान्वये गुन्हे दाखल झाले आहेत.

चेतन सुनील मुळे असं या भोंदू महाराजाचे पुर्ण नाव. चेतन मुळे गुलाल शेष बाबांच्या नावाने भरतो दरबार. दहावी नापास असलेल्या महाराजांचा गेल्या दहा वर्षांपासून दरबार भरतो. दरबारात लिंबू फेकणे, कोडं सोडवणे, अनेक व्याधी, रोग आणि कौटुंबिक समस्यांवर महाराजांचा उपचाराचा दावा. एकट्या निंबा गावात चार महाराज आणि त्यांचा दरबार भरतो. हे चार महाराज असल्याचे कळते.त्यात संदीप दिलीप विटीवाले, चेतन सुनील मुळे, मधुकर नामदेव चौके व राजेंद्र ओंकार डहाके आदी.

# अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

प्रतिनिधी २४ एप्रिल

**अकोला :** एमआयडीसी पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या गंभीर प्रकरणात अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांच्यावर स्टोन क्रशर व्यावसायिकांकडून दरमहा खंडणी मागितल्याचा आरोप आहे. या प्रकरणात न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला असून प्रकरणाची चौकशी सुरू आहे. अकोला स्टोन क्रशर असोसिएशनचे सदस्य विवेक बिजवे यांनी १३ एप्रिल २०२६ रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांनी असोसिएशनमधील प्रत्येक सदस्याकडून दरमहा १५ हजार रुपये मागितले. १९ मार्च २०२६ रोजी गायकवाड यांनी फोनवरून धमकी देत पैसे न दिल्यास स्टोन क्रशरचे काम बेकायदेशीर ठरवून बंद करण्याची कारवाई करू, असे सांगितले. त्यानंतर फिर्यादीने त्याच दिवशी त्यांच्या निवासस्थानी जाऊन १५ हजार रुपये रोख दिल्याचा आरोप आहे. त्यानंतरही इतर सदस्यांनी पैसे न दिल्याने नायब तहसीलदारांमार्फत काही ठिकाणी मोजमाप व तपासणीची कारवाई करण्यात आली. तसेच १ एप्रिल रोजी पुन्हा फोन करून गंभीर परिणामांची धमकी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. सरकारी पक्षाने हा गंभीर गुन्हा असल्याचे सांगत चौकशीसाठी कोठडी मागितली.

# नांदुरा तहसीलदारांवर दालनामध्येच जीवघेणा हल्ला

प्रतिनिधी २४ एप्रिल

### ♦ वाळू माफियांकडून लोखंडी वस्तूने डोक्यावर प्रहार

**नांदुरा :** रेतीच्या अवैध वाहतुकीवर कारवाई केल्याचा राग मनात धरून वाळू माफियां कडून थेट तहसील कार्यालयात घुसून तहसीलदार आणि कर्मचाऱ्यांवर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना गुरुवार, २३ एप्रिल रोजी नांदुरा येथे घडली. या हल्ल्यात तहसीलदार अजितराव जंगम जखमी झाले असून, शासकीय कामात अडथळा आणणे, मारहाण व जीवे मारण्याची धमकी देणे अशा विविध कलमान्वये नांदुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी नांदुरा-मोताळा बायपासजवळ तहसीलदारांच्या पथकाने रेतीचा अवैध वाहतूक करणारा एक टिप्पर (क्रमांक एम. एच.-२८ एबी-७६३८) पकडला होता. या वाहनावर दंडात्मक कारवाई करून ते तहसील कार्यालयात जमा करण्यात आले होते. या कारवाईमुळे टिप्पर मालक समाधान भगवान मोरे याचा संताप वाढला होता. कारवाईचा राग मनात ठेवून समाधान मोरे हा आपल्या एका साथीदारासह थेट नांदुरा तहसील कार्यालयात दाखल झाला. दोघांनी सुरुवातीला अव्वल कारकून स्वप्नील चव्हाण यांच्याशी वाद घालून त्यांना धमकावले.दोन्ही आरोपी थेट तहसीलदार अजितराव जंगम यांच्या दालनात घुसले. तहसीलदार आपल्या कामात व्यस्त असताना आरोपींनी अचानक त्यांच्यावर हल्ला केला. आरोपींपैकी एकाने मागून लोखंडी वस्तूने तहसीलदारांच्या डोक्यावर जोरदार प्रहार केला. यानंतर दोघांनी तहसीलदारांना गळा दाबून चापट बुक्क्यांनी मारहाण केली. या झटापटीत तहसीलदारांचा शर्ट फाटला असून, त्यांचे शासकीय ओळखपत्रही हिसकावून घेण्यात आले. आरोपींनी 'तू वाळूच्या गाड्या पकडतोस, तुला जिवंत सोडणार नाही' अशी धमकी देत भीतीचे वातावरण निर्माण केले.कार्यालयातील इतर कर्मचारी मदतीसाठी धाव घेत असल्याचे पाहून दोन्ही आरोपी घटनास्थळावरून पांढऱ्या रंगाच्या विना नंबरच्या कारने फरार झाले.या घटनेनंतर कार्यालय परिसरात एकच गोंधळ उडाला. यावेळी नागरिकांनीही मोठ्या संख्येने गर्दी केली होती. या प्रकरणी नायब तहसीलदार सुभाष वहट्टे यांच्या फिर्यादीवरून नांदुरा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १३२, १२१ (१), १२१(२), ३५२, ३५१ (२), ३५१ (३), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बसंती हॉस्पिटल
श्रीमती बसंती चांडक रिलीफ फाउंडेशन
३८ वा वर्धापन दिन
■ नेत्र विभाग - मोतीबिंदुकरिता बिना टाक्याचे ऑपरेशन
■ डायलिसीस विभाग - २५ मशिन डायलीसीस सुविधा
■ अस्थिरोग विभाग - मणक्याचे आजार व शस्त्रक्रिया
■ युरोलॉजी विभाग - किडनी स्टोन ऑपरेशन
■ पल्मालॉजी विभाग - पल्मालॉजी, दमा, धुम्रपान, निमोनिया.
महात्मा ज्योतिबा फुले एकत्रित प्रधानमंत्री जनआरोग्य योजना उपलब्ध.
संपर्क
बसंती हॉस्पिटल
रामदास पेठ, अकोला. फो : 0724-2411711, 2444863

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK